




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०९ ■ मंगळवार, दि.१९ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## प्रदूषण नियंत्रणाचा निधी रस्त्यासाठी खर्च झाला असल्यास चौकशी करू



प्रतिनिधी १९ मे

**अकोला:** पर्यावरण संरक्षणासाठी आलेल्या १० कोटी रुपयांतून महेश भवन ते तुकाराम चौक सिमेंट रस्ता तयार केला. अकोलेकरांना उष्णतेच्या खाईत लोटण्याचा प्रकार आहे असा आरोप आहे. परंतु नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम अंतर्गत आलेला निधी रस्त्यासाठी वापरला असेल तर त्याचे महापालिकेकडून स्पष्टीकरण घेऊ असे खासदार अनुप धोत्रे म्हणाले.

खासदार धोत्रे म्हणाले, अकोला शहर आणि देशात प्रदूषण नियंत्रणासाठी अर्बन मिनिस्ट्री च्या माध्यमातून लक्ष दिले जात आहे. अकोला शहरासाठी ९ ई बसेस मिळणार आहेत. ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. शहरांचा एअर क्वालिटी इंडेक्स १०० च्या आत असावा असे बंधन आहे. अकोला शहराचा एक्यूई ८० आहे. हिवाळ्यात देखील तो नियंत्रित राहावा यासाठी सतर्कता बाळगली जात आहे.

त्या फंड मधून प्रदूषण रोखण्याचे उपाय करण्याऐवजी सिमेंट रोड तयार झाला असल्यास त्याची माहिती घेऊ. निकषात बसतो की नाही हे पाहू. प्रदूषण नियंत्रणासाठी आलेले १० कोटी रुपये कसे वापरले याचे स्पष्टीकरण घेऊ असे खासदार अनुप धोत्रे म्हणाले. महापौर, आयुक्त यांच्याकडे पत्रव्यवहार करू तसेच चुकीचे झाले असेल तर कारवाई व्हावी. तसेच केंद्र आणि राज्याच्या माध्यमातून या भागातील प्रदूषण कसे कमी करता येईल यावर फोकस करू असे त्यांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना सांगितले.

एनकॅप निधीचा वापर कसा झाला हा मुद्दा आपण लोकसभेत मांडला होता असे सांगून खासदार धोत्रे म्हणाले, धुळीची समस्या दूर व्हावी म्हणून ऑटोमेटेड मशीन आल्या. विविध माध्यमातून प्रदूषण नियंत्रणाला प्राधान्य दिले जात आहे.

# राजकारणाचा जादूगार 'राष्ट्रवादी' चे भाग्य बदलणार !

## प्रशांत किशोर पक्षाचे नवीन रणनीतीकार

प्रतिनिधी १९ मे



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून डिझाईन बॉक्सनंतर लवकरच नव्या राजकीय रणनीती ठरवणाऱ्या संस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे. काल १८ मे रोजी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासोबत प्रशांत किशोर यांची बैठक पार पडली. या बैठकीत महत्वाचा निर्णय घेण्यात आला. प्रशांत किशोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रणनीतीकार म्हणून काम पाहणार आहेत.

अजितदादांच्या राष्ट्रवादीत काहीच आलबेल नसल्याचा दावा करण्यात येत आहे. काही ज्येष्ठ नेते नाराज असल्याचा सूर उमटला आहे. तर राष्ट्रवादीतील घाडमोडींवर तोडगा काढण्यासाठी वर्षांवर दोन्ही गोटातील नेत्यांचा राबता वाढल्याचेही म्हटले जात आहे. या अंदाजपंचमीत अजून एक बातमी येऊन धडकली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात बिहार पॅटर्न चालणार का? याची जोरदार चर्चा रंगली आहे. प्रशांत किशोर हे राजकीय धुरंधर म्हणून ओळखले जातात. त्यांच्या खास निवडणुकीतील स्ट्रॅटर्जीने विजय खेचून आणला आहे. त्यांच्या खेळीने अनेक दिग्गज नेते भूसपाट झालेले आहेत. तर नवख्यांचे नशीब फळफळले आहेत. आता प्रशांत किशोर हे दादांच्या राष्ट्रवादीची राजकीय कमान संभाळण्यासाठी मोलाचा सल्ला देणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकीय सल्लागार म्हणून ते काम पाहणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.बैठकीचे सोपस्कर पूर्ण झाल्यानंतर येत्या २ दिवसांत कायदेशीर बाबी पूर्ण करून लवकरच प्रशांत किशोर यांची कंपनी कामाला सुरुवात करणार आहेत. १ जूनपासून प्रशांत किशोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रणनीतीकार म्हणून काम पाहणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, प्रशांत किशोर निवडणुकीचे चाणक्य म्हणून ओळखले जातात. पुढेचे ३ वर्षे राष्ट्रवादी काँग्रेससाठी महत्वाचे असणार आहे.

### कोण आहेत प्रशांत किशोर?

प्रशांत किशोर हे एक प्रसिद्ध भारतीय राजकीय रणनीतिकार आणि 'जन सुराज पक्षा'चे संस्थापक आहेत. त्यांना राजकीय वर्तुळात 'पीके' म्हणूनही ओळखले जाते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्यासाठी यशस्वी प्रचार मोहीम राबवल्यानंतर ते देशभरात प्रकाशझोतात आले. त्यानंतर त्यांनी बिहारमध्ये नितीश कुमार, तसेच ममता बनर्जी, वाय. एस. जगन मोहन रेड्डी, एम. के. स्टॅलिन आणि आम आदमी पार्टी यांसारख्या विविध पक्षांसाठी यशस्वी निवडणूक रणनीती आखली आहे. प्रशांत किशोर यांनी सुरुवातीला संयुक्त राष्ट्रसंघासोबत सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात ८ वर्षे काम केले होते.

### राष्ट्रवादीला येणार सुगीचे दिवस?

अजितदादांच्या निधनापूर्वी त्यांचे गुलाबी कॅम्पेन गाजले होते. त्यांनी भाजप आणि शिवसेना या मित्र पक्षासोबतच अनेक निवडणुकीत चांगली मुसंडी मारली होती. पण दादा गेल्यानंतर पक्षातील धुसफूस सातत्याने समोर येत आहे. सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे नाराज असल्याची चर्चा आहे. तर खासदार पार्थ पवार, जय पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मनात काय सुरू आहे हे समोर आलेले नाही. पक्षातून सातत्याने गोंधळ उडवणाऱ्या खबरा, बातम्याच समोर येत असल्याने पक्षाची प्रतिमा डागळली जात आहे. त्याचवेळी राजकीय चाणक्य प्रशांत किशोर हे राष्ट्रवादीचे सल्लागार असतील असे वृत्त पक्षाला सुगीचे दिवस आणतील का? अशी चर्चा होत आहे.

### छगन भुजबळ यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट!

मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. अलीकडेच पार्थ पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, इतकेच नाही तर या पाठोपाठ आणखी दोन राष्ट्रवादी अजित पवार गटातील नेत्यांनी थेट वर्षा या निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आहे. खासदार सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्रीशी चर्चा केली. या भेटीनंतरच धनंजय मुंडे यांनीही भेट घेतल्यामुळे राष्ट्रवादीत नेमकं काय घडतंय याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, अशी माहिती समोर आली आहे. त्यांनी कांद्याच्या निर्यात आणि दरांबाबत सविस्तर चर्चा केल्याचीही माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

## मोटेगावकर पेपर लिक करणाऱ्या गँगचा सक्रिय सदस्य- सीबीआय

प्रतिनिधी १९ मे

नीट पेपरफूट प्रकरण

**मुंबई :** नीट पेपरफुटीचा कट शिवराज मोटेगावकरने त्याच्या साथीदारांना हाताशी धरुन अतिशय सुनियोजितपणे आखल्याचे सीबीआयच्या तपासात समोर येत आहे. त्यासाठी मोटेगावकरने सर्वात आधी त्याच्या क्लासमधे काम करणाऱ्या पीव्ही कुलकर्णीची एनटीएच्या प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्या पॅनलवर वर्णी लावून घेतली. सोबत मनीषा मांढरे हीची देखील त्या पॅनलवर वर्णी लावण्यात आली. कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि त्या मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार, अशी सोय करण्यात आली. मोटेगावकरने त्याच्या आर्थिक ताकतीच्या बळावर हे घडवून आणले. म्हणूनच सीबीआयने मोटेगावकर हा पेपर लिक करणाऱ्या गँगचा सक्रिय सदस्य असल्याचे म्हटले आहे.नीट पेपरफुटीप्रकरणी मनीषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली आहे. याचदरम्यान, मनीषा मांढरेबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

### मनीषा मांढरेवर निलंबनाची कारवाई

नीट पेपर फुटी प्रकरणात अटकेत असलेल्या प्रा. मनीषा मांढरे हिच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून मनीषा मांढरेच्या निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले आहेत. महाविद्यालयाच्या प्रशासकीय बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. मनीषा मांढरेचा नीट पेपरफुटीमध्ये हात असल्याचं समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### अकोल्यासह आरसीसीच्या शाखांना अघोषित सुटी

मोटेगावकर सरांचे आरसीसी क्लास अकोल्यातही असून गत आठवड्यापासून त्या क्लासला सुटी देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी आपल्या गावाला गेले आहेत. तसेच नांदेड येथील शिकवणी वर्गही बंद करण्यात आले असून, बहुतांश ठिकाणी त्यांचे शिकवणी बंद असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे लाखो रूपये फी भरलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.




### पेपरफुटीचा मास्टरमाईंड नागपूरचा आलोक!

देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील 'आरसीसी क्लासेस' या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) सोमवारी अटक करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. मोटेगावकर याला नऊ दिवस 'सीबीआय' कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले. नीट पेपरफूट घोटाळयात किमान एक हजार विद्यार्थ्यांनी हा पेपर खरेदी केल्याचा दाट संशय सीबीआयला आहे. नांदेड कनेक्शनमध्ये असलेला नागपूर येथील 'आलोक' सीबीआयच्या रडारवर असून, तो पेपरफुटीचा मास्टरमाइंड असल्याचे समोर येत आहे.

## अकोल्यामध्ये उष्माघाताचा बळी?

प्रतिनिधी १९ मे




**अकोला :** अकोला शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. असदगड किल्ल्याच्या पायथ्याशी हा मृतदेह आढळलाये. याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले, मृतदेहाच्या अंगावर कुठल्याही मारहाणीच्या जखमा नाहीत. मात्र, जास्त प्रमाणात ऊन लागल्याने नाकातून रक्तस्त्राव झाला असावा, म्हणून या व्यक्तीचा कदाचित उष्माघातामुळे मृत्यू झाला, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी या ठिकाणी व्यक्त केलाय. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. राजेशसिंग ठाकुर असं या मृत व्यक्तीच नाव असून तो ५० वर्षीय आहे. मृतदेहाच्या वैद्यकीय अहवालानंतरच मृत्यूचं मूळ कारण स्पष्ट होईल. मात्र पोलिसांनी या मृत्यू मागे उष्माघाताचा संशय व्यक्त केलाये. दरम्यान, अकोला जिल्ह्यात मागील काही दिवसापासून तापमानात मोठी वाढ होतंये.. काल अकोल्यातील तापमान ४६.३ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं होतंये.

अकोला जिल्ह्यात उष्ण लाटेचा इशारा कायम असून नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे आज '२३ मे'पर्यत अकोला, तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

## धामणा येथील शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

प्रतिनिधी १९ मे



**अकोला:** जिल्ह्यातील बाळापुर तालुका अंतर्गत येत असलेल्या धामणा येथील शेतकरी मधुकर बाबाराव पागधुणे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, परंतु वेळीच पोलिसांच्या सतर्कतेमुळे सदर शेतकऱ्याचे प्राण वाचले.

बाळापुर तालुक्यातील पूर्णा ब्यारेज मध्ये धामणा येथील शेतकरी मधुकर बाबाराव पागधुणे यांची शेती प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. सदर शेतकऱ्याची दोन एकर शेती ही या प्रकल्पात गेल्याने सदर शेतकऱ्याला शेतीचा मोबदला योग्य मिळत नसल्याने त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारती नजिक आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, यावेळी उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे सदर शेतकऱ्याचे प्राण वाचले. बाळापुर तालुक्यातील धामना येथील ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहित झाल्या आहेत त्यांना शासनाकडून जास्त प्रमाणात मोबदला मिळाला आहे. तर त्याच गावातील शेतकरी मधुकर पागधुणे यांना कमी मोबदला देण्यात येणार असल्याने त्यांनी बाळापुर उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांच्याकडे शेतीचा मोबदला योग्य मिळावा अशी मागणी केली होती. परंतु त्यांच्याकडून कुठलाही ठोस निर्णय न लागल्याने आज अखेर पागधुणे या शेतकऱ्याने आज आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला होता. आज दुपारच्या सुमारास पागधुणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठीत त्या ठिकाणी अंगावर पेट्रोल घेण्याचा प्रयत्न केला. परंतु सुदैवाने पोलिसांच्या मदतीने त्यांचे प्राण वाचले, या पश्चात पागधुणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत आपल्या शेतीचा मोबदल्याबाबत निवेदन सादर केले आहे.

## पेट्रोल-डिझेलचा पुन्हा भडका..!



प्रतिनिधी १९ मे

**मुंबई :** अवघ्या चार दिवसात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतील पेट्रोलचा दर थेट १०७.४९ तर डिझेल ९४.०२ रुपयांच्या घरात पोहोचले आहे. १५ मे रोजीच पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत तीन रुपयांनी वाढ करण्यात आली होती आणि आता अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा दरवाढ करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे. मंगळवारी सकाळपासून हे नवे दर लागू झाले आहेत.इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचे दर कडाडले आहेत. त्यामुळे भारतीय पेट्रोलियम कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत होता. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपताच केंद्र सरकारने यापैकी काही भार सर्वसामान्यांवर टाकायचे ठरवले असून त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ होताना दिसत आहे.







# आता गल्लीबोळातील कुत्र्यांचा 'गेम ओव्हर'..!

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय; मानवी जीवनाला धोकादायक कुत्र्यांना इच्छामरण द्या!

वृत्तसंस्था १९ मे

**नवी दिल्ली :** देशभरात भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. हे भटके कुत्रे अनेक निष्पाप नागरिकांवर जीवघेणे हल्ले करत असून आता या जीवघेण्या हल्ल्यांची सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. सार्वजनिक ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचे दिलेले पूर्वीचे आदेश कायम आहेत. राज्यांनी ७ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशाचे योग्य पालन केलेले नाही. यापुढे जर नियमांची अंमलबजावणी झाली नाही, तर आम्ही याला थेट न्यायालयाचा अवमान मानू, अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ताकीद दिली आहे.



मंगळवारी (१९ मे २०२६) याप्रकरणी सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने एका महत्त्वाच्या निर्देशात म्हटले आहे की, जे भटके कुत्रे अत्यंत गंभीर आजारी आहेत आणि मानवी जीवनाला धोकादायक ठरत आहेत, त्यांना इच्छामरण देण्याचा (ठार मारण्याचा) विचार प्रशासनाने करावा. हा केवळ कायदा सुव्यवस्थेचा भाग नसून सार्वजनिक आरोग्य, मानवी सुरक्षितता आणि पर्यावरणीय संतुलनाचा अत्यंत संवेदनशील प्रश्न आहे. जर सर्व राज्यांनी 'प्राणी जन्म नियंत्रण' नियमांचे प्रामाणिकपणे पालन केले असते, तर आज देशावर ही भीषण परिस्थिती ओढवली नसती, अशा शब्दात न्यायालयाने सरकारला फटकारले. न्यायालयाने पुढे म्हटले की, 'भटके कुत्रे आज सर्रास लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना लक्ष्य करत आहेत. देशातील जनता भयभीत झाली आहे आणि आम्ही अशा परिस्थितीकडे डोळेझाक करू शकत नाही.

### असे दिले न्यायालयाने निर्देश

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी 'प्राणी जन्म नियंत्रण' आराखडा त्वरित लागू करावा, प्रत्येक शहरात कुत्र्यांची नसबंदी व उपचारासाठी सुसज्ज केंद्र असावे, कुत्र्यांना पकडणाऱ्या कर्मचाऱ्यांना शास्त्रोक्त पद्धतीचे योग्य प्रशिक्षण देण्यात यावे, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये रेबीज प्रतिबंधक लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हायवेवरील मोकाट जनावरे आणि कुत्र्यांना तात्काळ हटवावे, मोकाट जनावरांसाठी गोशाळा बांधून त्यांचे पुनर्वसन करावे, न्यायालयाच्या आदेशानुसार कुत्र्यांवर कारवाई करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना विनाकारण कायदेशीर कचाट्यात अडकवून छळू नये.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

मंगळवार, दि. १९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## रस्त्यांच्या कामामुळे रहदारीला अडथळा

**अकोला :** शहरात सध्या अनेक ठिकाणी रस्त्याचे खोदकाम करण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी पेव्हर ब्लॉकसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजू खोदून ठेवल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शिकवणी वर्गाचा एरिया म्हणून प्रसिद्ध असलेल्या तोष्णीवाल लेआउटमध्ये एका ठिकाणी रस्ता दोन्ही बाजूने खोदून ठेवला असून रस्त्यावर मुरूमाचे ढीग टाकलेले आहेत.

त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक बंद पडली आहे. तसेच एका ठिकाणी रस्ता मधोमध खोदणे सुरू असल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांना फेऱ्याने इच्छीत स्थळी जावे लागत आहे. त्या भागातील तसेच शहरातील नागरिकांना दुसरीकडून जावे लागत आहे.

# आरक्षित प्रवर्गाचे मेरिट नाकारणारा तुघलकी निर्णय...!

महाराष्ट्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार, राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी स्पर्धा परीक्षांमध्ये वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता किंवा अनुभवामध्ये सवलत घेतली आहे, त्यांना आता खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही. अशा उमेदवारांची निवड केवळ राखीव कोट्यातूनच केली जाईल.

महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि १६ चे उल्लंघन असून संविधानाने राज्य सरकारवर मागासवर्गीयांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या सोपविलेल्या जबाबदारीचे भान न ठेवता काढलेला तुघलकी निर्णय आहे.सामान्यात: खुला प्रवर्ग म्हणजे शैक्षणिक प्रवेश आणि नोकर भरतीमध्ये कोणत्याही जात किंवा आरक्षित प्रवर्गासाठी आरक्षित नसलेल्या जागांचा प्रवर्ग होय. या प्रवर्गात जात किंवा धर्मापेक्षा केवळ गुणवत्तेला प्राधान्य असते. खुला प्रवर्ग हा 'सर्वांसाठी खुला' असून या प्रवर्गात केवळ गुणवत्तेच्या आधारे कोणत्याही उमेदवाराला प्रवेश मिळण्याचा अधिकार असतो.

**सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय :** सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी स्पष्ट केले की, खुल्या प्रवर्गात केवळ गुणवत्ता महत्त्वाची असते. जर एखाद्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने खुल्या प्रवर्गाच्या कट-ऑफइतके किंवा त्याहून अधिक गुण मिळवले, तर त्याची निवड खुल्या प्रवर्गातच केली जाते.

एका महत्त्वाच्या निर्णयात न्यायालयाने म्हटले आहे की, जर एखाद्या उमेदवाराने केवळ पात्रता परीक्षेमध्ये वयाची किंवा शुल्काची सवलत घेतली असेल, परंतु मुख्य परीक्षेत तो खुल्या प्रवर्गातील उमेदवारांइतके किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवत असेल, तर त्याला खुल्या प्रवर्गात जाण्यापासून रोखता येणार नाही. न्यायालयाने पुन्हा एकदा हे अधोरेखित केले आहे की, 'खुला प्रवर्ग' हा उच्च जातींसाठी राखीव असलेला कोटा नाही. तो एक गुणवत्तेचा प्रवर्ग आहे, ज्यामध्ये कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा उमेदवार स्वतःच्या गुणवत्तेवर स्थान मिळवू शकतो.

एका ठिकाणी आरक्षणाचा व दुसऱ्या ठिकाणी खुल्या प्रवर्गाचा लाभ घेणे म्हणजे दुहेरी फायदा होय असा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला असून दुहेरी फायदा ही संकल्पना अमान्य केली आहे. आरक्षित उमेदवाराला मिळालेली सवलत ही केवळ स्पर्धेत 'समान संधी' मिळवण्यासाठी असते, तर निवड ही केवळ गुणवत्तेवर आधारित असते असे स्पष्ट केले आहे. मार्च २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा २०२५ चा एक निर्णय रद्द केला. उच्च न्यायालयाने म्हटले होते की सवलत घेणारे आरक्षित उमेदवार खुल्या प्रवर्गात जाऊ शकत नाहीत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हे चुकीचे ठरवत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गात सामावून घेण्याचे आदेश दिले आहेत.



खुल्या प्रवर्गातील लोकांनी आरक्षित उमेदवारांच्या खुल्या प्रवर्गातील नियुक्ती बाबत आक्षेप घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्यायालयाने खुल्या प्रवर्गाबाबत राज्यांनी स्पष्टता करावी असे म्हटले. मात्र महाराष्ट्र सरकारने याचा सोयीनुसार अर्थ काढून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अवहेलना करून वय, शैक्षणिक पात्रता, परीक्षा शुल्क, परीक्षेत बसण्याच्या संधी याचा लाभ घेणाऱ्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना त्यांनी स्पर्धा परीक्षेत मेरिट मिळविले तरी त्यांची खुल्या प्रवर्गातून निवड होणार नाही तर त्यांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या पदांमध्येच निवड होईल असा असंवैधानिक आणि तुघलकी निर्णय घेऊन आरक्षित प्रवर्गातील बहुसंख्य म्हणजे ८५ टक्के उमेदवारांवर अन्याय केला आहे. महाराष्ट्र सरकार वेळोवेळी अनेकविध तंत्र व कपट नीतीचा अवलंब करून राज्यातील आरक्षण व्यवस्था पूर्णतः संपवून टाकण्याचे षडयंत्र राबवित आहे. अलिकडे सरकारी नोकऱ्या मोठ्या प्रमाणात गोठवून कंत्राटी पद्धतीने नोकरभरती केली जात आहे, ज्यात आरक्षण नाही. तर जवळपास सर्वच क्षेत्राचे खाजगीकरण करून सरकारी नोकऱ्या कमी केल्या आहेत. परिणामी आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना फक्त एमपीएससी व युपीएससी परीक्षांच्या माध्यमातूनच सरकारी नोकरी मिळविण्याची संधी उपलब्ध आहे.

त्यामुळे करोडो विद्यार्थी अत्यंत परिश्रमाने या परीक्षांची तयारी करतात. आपली गुणवत्ता सिद्ध करून नोकरी मिळविण्याची संधी प्राप्त करतात. मात्र अलिकडे शासनाने आरक्षित प्रवर्गाच्या हिताविरुद्ध अनुसूचित जाती मध्ये अबकड असे उपवर्गीकरण करण्याचा घाट घातला असून आता आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना आपल्या मेरिट नुसार खुल्या प्रवर्गातून निवडीची संधी नाकारली आहे. शासनाचे हे धोरण आरक्षण संपुष्टात आणण्याचेच धोरण नव्हे काय? एक फार सुंदर आणि प्रेरणादायी गोष्ट आहे. 'एका गावात एक वृद्ध शेतकरी राहत होता. त्याला पाच मुले होती. ती पाचही मुले नेहमी एकमेकांशी भांडत असत. शेतकऱ्याने त्यांना अनेकदा समजावून सांगितले, पण त्यांच्या भांडणात काहीच फरक पडला नाही. एक दिवस शेतकरी आजारी पडला. त्याने आपल्या पाचही मुलांना जवळ बोलावले. त्याने पाच लाकडी काठ्या मागवल्या आणि एका मुलाच्या हातात एक काठी देऊन ती मोडण्यास सांगितली. त्या मुलाने ती काठी सहज मोडून टाकली. त्यानंतर प्रत्येकाला एकेक काठी देऊन ती मोडण्यास सांगितली, सर्वांनी ती काठी सहज मोडली. आता शेतकऱ्याने त्या पाचही काठ्या एकत्र केल्या आणि त्यांची एक घट्ट जुडी बांधली. त्याने एकेका मुलाला ती जुडी मोडायला सांगितली. मुलांनी खूप प्रयत्न केले, पण ती काठ्यांची जुडी कोणालाही मोडता आली नाही. हे पाहून शेतकरी मुलांना म्हणाला, 'मुलांनो, तुम्ही या काठ्यांसारखे आहात. जर तुम्ही वेगळे राहिलात, तर तुम्हाला कोणीही सहज त्रास देऊ शकेल किंवा हरवू शकेल. पण जर तुम्ही या काठ्यांच्या जुडीसारखे एकसंघ राहिलात, तर तुमचे कोणीही काही वाकडे करू शकणार नाही.' यावरून आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एकतेमध्येच खरी शक्ती असते. म्हणून आरक्षित प्रवर्गातील समाजाने सजग व एकसंघ राहणे काळाची गरज आहे. 'भवतु सब्ब मंगलम्'

**प्रा. डॉ. एम.आर.इंगळे,**
विभागीय सचिव डाटा अकोला



**गेल्या काही महिन्यांपासून मध्यपूर्वेत युद्ध सुरू आहे. कोणाची भूमिका योग्य आणि कोणाची अयोग्य हा चर्चेचा विषय नाही. या युद्धाने जगातील जवळपास सर्व देशांच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. इराण ने स्वतःवर झालेल्या हल्ल्याचा वचपा काढण्यासाठी, तेल आणि गॅस चा पुरवठा करणाऱ्या इतर देशांचे तेल शुद्धीकरण तसेच गॅस प्रकल्प हल्ले करून नष्ट केले. समुद्री मार्गावर कब्जा करून तेल, गॅस, शेतीसाठी वापरण्यात येणारे खतं व अन्य साहित्याची वहातूक करणाऱ्या जहाजांवर हल्ले करून, मार्ग रोखला आहे. अनेक देशांचे जहाज समुद्र मार्गात अडकून पडल्याने त्या देशात तेल, गॅस आणि खतं आदींचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे.**

## विरोध करावा षडयंत्र नाही

काही देशात स्वयंपाकाचा, व्यावसायिक गॅस, पेट्रोल व डिझेल च्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. परिणामी महागाई देखील वाढली आहे. वृत्तवाहिन्या तसेच वृत्तपत्रातून आपण दररोज बातम्या बघतो आणि वाचतो. दरवाढ झाली असली तरी अन्य देशांच्या तुलनेत आपल्या देशाची परिस्थिती खूप चांगली आहे.

काही देशात दोन-तीन वर्षा पासून सतत युद्ध सुरू आहे. देशाची अनेक शहरं, कारखाने उध्वस्त झाले आहेत, मोठ्या प्रमाणात जीवहानी झाली असून बेरोजगारी वाढली आहे. तेथील नागरिक जीवनोपयोगी वस्तू, वैद्यकीय सेवा अभावी प्रचंड हाल अपेष्टा सोसत आहेत. परंतू अश्याहि परिस्थिती तिथले नागरिक आणि विरोधी पक्ष, देशाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. कारण त्यांच्यात देशाचे महत्त्व आणि देशप्रेम ठासून भरले आहे. त्यांच्या शिक्षण तसेच समाजव्यवस्थेने त्याचे बाळकडू त्यांना भरभरून पाजले आहे. काही देशांचे भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्या तर आपल्या मुंबई महानगरा इतकी आहे.


आपल्याला स्वातंत्र्य विनासंघर्ष मिळाले आहे असे धदांत खोटं आपल्या मनावर बिंबवण्यात आले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कितीजणांनी बलिदान दिले, किती निष्पापांच्या हत्या झाल्या, आया बहिणींवर अमानुष अत्याचार झाले हे हेतुपुरस्सर दडवून ठेवले. आपली शिक्षण आणि सामाजिक व्यवस्था मुलांच्या मनावर देशाचे महत्त्व, देशप्रेम, त्याग आणि समर्पणाची भावना बिंबवण्यात, रुजवण्यात अपयशी ठरल्यामुळे अनेकांना देशा बाबत प्रेम आणि आस्था वाटत नाही. १४० कोटी इतकी अफाट लोकसंख्या असलेल्या देशात नागरिकांच्या गरजांची पुर्तता करणे सोपे काम नाही. आपल्यापेक्षा अनेक प्रगत आणि आपल्या शेजारी देशांच्या परिस्थितीचे अवलोकन केले तर, फिरुन आपण खुप सुखी आहोत हे जाणवते. अर्थात सुख हे मानण्यावर असते.

आपल्या देशातील एक वर्ग कायम काही उणे शोधण्यात मग्न असतो. त्याशिवाय त्यांच्या घशाखाली घास उतरत नाही. अहिंसेच्या मार्गाने आम्ही देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. अश्या थापा मारणाऱ्यांना जनतेने सत्तेबाहेर केल्यापासून त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. जनता आता आपल्याला स्वीकारत नाही हे लक्षात आल्यावर. त्यांनी आपले देश विघातक अस्त्र बाहेर काढले आहे. परदेशात जाऊन देशाची प्रतिमा मलीन करणे, अर्थव्यवस्था ढेपाळली असल्याचा अपप्रचार करणे, देशाची सुरक्षा व्यवस्था आणि लष्करी क्षमते बद्दल प्रश्न उपस्थित करणे, देशाच्या लष्करात जातीभेद निर्माण करून फूट पडण्याचा प्रयत्न करणे, देशातील अल्पसंख्यांक आणि मागास जातींवर अन्याय होत असल्याचे चित्र निर्माण करून त्यांच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न करणे, अतिरेक्यांचे समर्थन करणे, हिंदू आतंकवादाचा बोंगा उभा करणे, आंदोलनं छेडून नागरिकांना विनाकारण वेठिस धरुन, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण करणे, देशातील तरुणाईला भडकवणे अश्या प्रकारचे विध्वंसक कार्यक्रम सुरू आहेत. शासन करत्यांचे धोरण आणि निर्णय चुकल्यास त्याचा विरोध केलाच पाहिजे परंतू संवैधानीक पद्धतीने. वेळोवेळी संवीधानाचा आधार घेणाऱ्यांनी हे विसरता कामा नये. जनता खुप सुज्ञ आहे. देशावर घोंगावत असलेल्या संकट काळात, जे देशविरोधी कारवाया करतात त्यांना ती त्यांच्या कर्माची शिक्षा न बोलता देतेच.

**हेमंत जकाते**
अकोला.

### दिन विशेष

## नव्या रंगभूमीचे आधारस्तंभ : विजय तेंडूलकर



आज पुण्यतिथी

विजय तेंडुलकरांचा जन्म ६ जानेवारी १९२८ रोजी मुंबई येथील मुगभाट, गिरगांव येथे झाला. त्यांचे वडील धोंडोपंत तेंडुलकर हे स्वतः लेखक, प्रकाशक आणि हौशी नट होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीतून तेंडुलकरांवर वाङ्मयीन संस्कार होत गेले. दि.बा. मोकाशी, वि.वि. बोकील, अनंत काणेकर, शिवरामपंत वाशीकर यांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातूनही घडवणूक होत गेली. तेंडुलकरांचे औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्या काळात जोमाने चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. साहजिकच या कालखंडात विविध विचारसरणींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांचे वास्तव्य पुण्यात आणि मुंबईत असे. लेखिका आणि अभिनेत्री प्रिया तेंडुलकर या त्यांच्या कन्या होत.


विजय तेंडुलकर हे एक चतुरस्त्र लेखक, वृत्तपत्रव्यवसायी, लघुकथालेखक, लघुनिबंधकार, अखिल भारतीय कीर्तीचे नाटककार, नव्या रंगभूमीचे प्रमुख आधारस्तंभ. त्यांचा जन्म मुंबई येथे झाला. शिक्षण मुंबई, पुणे आणि कोल्हापूर येथे झाले. १९४३ मध्ये शालेय शिक्षणात खंड पडला. प्रसिद्ध साहित्यिक वि. वि. बोकील हे त्यांना पुण्यास शिक्षक म्हणून लाभले. बोकिलांप्रमाणेच दि. बा मोकाशी ह्यांच्या कथालेखनाचे तसेच अनंत काणेकर व शिवराम वाशीकर ह्यांच्या संवादलेखनाचे संस्कार तेंडुलकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर झालेले आहेत. १९५७ पर्यंत त्यांचे वास्तव्य पुण्यात होते. पुढे काही काळ मुंबईत. पुणे–मुंबई, मुंबई–पुणे असा अनिश्चित भ्रमंतीचा काही काळ लोटल्यानंतर १९६६ पासून मुंबई हेच वास्तव्याचे व कामाचे कायम स्थान बनले. मुंबईतील वास्तव्यामुळेच तेंडुलकरांचा प्रयोगशील रंगभूमीशी व 'रंगायन', 'आविष्कार', 'भारतीय विद्या भवन कला केंद्र', 'अनिकेत' यांसारख्या नवनाट्याविषयी आस्था बाळगणाऱ्या संस्थांशी व त्यांतील कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचा संबंध आला. रंगभूमीशी आरंभापासूनच आत्मीयतेने निगडित असूनही तेंडुलकरांनी नाटकांकडे व्यावसायिक दृष्टिकोणातून पाहण्याचे कटाक्षाने टाळलेले आहे. वृत्तपत्रीय लेखन आणि नियतकालिकांचे संपादन हेच त्यांचे आरंभीचे आणि नंतरचेही उपजीविकेचे प्रमुख साधन. कोवळी उन्हे (१९७१), रातराणी (१९७१), फुगे साबणाचे (१९७४) यांसारखे त्यांचे स्फुट ललित निबंधसंग्रह यातूनच जन्माला आले. तेंडुलकर हे नियतकालिकांशी निगडित राहिल्याने त्यांनी लघुकथास्वरूपाचे किंवा व्यक्तिचित्रणात्माक पद्धतीचेही बरेच लेखन केलेले आहे. त्यातील काही काचपात्रे (१९५८), द्वंद्व (१९६१), मेषपात्रे (१९६५), गाणे (१९६६), फुलपाखरू (१९७०) इ. नावांनी संकलित केले गेले आहे. दिवाकरांच्या नाट्यछटाही त्यांनी संपादिल्या आहेत.

तेंडुलकरांचे प्रधान कार्यक्षेत्र रंगभूमी हेच. १९५५ पासून आजतगायत ते नाट्यलेखन करीत आहेत.

त्यांच्या नाट्यलेखनाचा प्रारंभ एकांकिका लेखनाने झाला. नभोवाणीकरिता लिहिलेली 'रात्र' ही त्यांची पहिली एकांकिका. ती बरीच लोकप्रिय ठरली. ध्वनिमाध्यमाचे तीत चातुर्याने उपयोजन केले आहे.

## रिल्सच्या दुनियेत हरवलेले रियल आयुष्य..!

एक काळ होता जेव्हा कोंबड्याने बाक दिल्यावर दिवस उजाडला असे समजले जायचे आणि तिथून दिवसाची सुरुवात व्हायची. आजचा काळ आहे की मोबाईलची रिंग वाजल्याशिवाय आम्हाला जाग येत नाही. एवढेच नाही तर रात्री सोशल मीडियावरील रिल्स स्क्रोल करता करता रात्रीचे एक-दोन कधी वाजतात हे आमचं आम्हाला सुद्धा कळत नाही. म्हणजेच सकाळी डोळे उघडल्यापासून रात्री झोपताना डोळे मिटेपर्यंत हातातील हा मोबाईल आमच्या जीवनाचा एक अविभाज्य अंग बनल्याचं पाहायला मिळत. पूर्वी माणसाच्या तीन मूलभूत गरजा होत्या अन्न, वस्त्र, निवारा त्यात नंतर एक शिक्षण ही गरज बनली आता त्यात आणखी एक भर पडली ते म्हणजे मोबाईल.



खऱ्या अर्थाने आजचा तरुणवर्ग प्रत्यक्ष जीवन जगण्यापेक्षा तेच जगणं सोशल मीडियावर दाखवण्यातच व्यस्त आहे. जे प्रत्यक्षात आपल्याकडे नाही किंवा जे आपलं नाही ते आपलंच कसा आहे हे रिल्स च्या माध्यमातून दाखवण्याच्या नादात आजचा तरुण दिशाहीन झालेला आहे. म्हणजेच आजची पिढी ही खऱ्या अर्थाने वास्तवापासून कोसो दूर चालली आहे .या रीलसच्या दुनियेत तो त्याचं रियल आयुष्य हरवून बसतोय. पूर्वी एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात एखादा सुखद किंवा दुःखद प्रसंग आला तर तो व्यक्ती आपल्या जवळच्या व्यक्तीला सांगून आपलं मन हलकं करायचा, आपल्या भावनांना वाट मोकळी करून द्यायचा आणि तेव्हा प्रत्येकाच्या आयुष्यात एखाद्या तरी जवळचा व्यक्ती असायचा. आता त्या जवळच्या व्यक्तीची जागा रिल्स ने घेतली आहे कारण आता जर आयुष्यात जर एखादा सुखद किंवा दुखद प्रसंगा आला तर सर्वात अगोदर तो व्यक्ती व्हाट्सअप किंवा इन्स्टाग्राम च्या सारख्या सोशल मीडियावर रिल्स बनवून किंवा स्टेटस ठेवून तिचा देखावा करण्यावर जास्त भर देतो.

आजच्या या तरुण पिढीचे सुख दुख आता त्याच्या पोस्टला किंवा रिल्सला मिळणाऱ्या लाइक्स आणि कमेंट्स वर ठरू लागले आहे. जास्त लाईक आणि जास्त व्ह्यूज मिळाले तर हवेत तरंगणे आणि कमी मिळाल्यास थेट नैराश्यात जाणे हे आजची शोकांतिका आहे. अगोदरच या तरुण पिढीसमोर वाढती बेरोजगारी आणि त्यामुळे वाढते लग्नाचे वय हे प्रश्न नैराश्याचे मोठे कारण ठरत असताना त्यात लाइक्स आणि व्ह्यूज यांची भर पडली आहे. म्हणजेच आजची पिढी ही लाईक्स आणि व्ह्यू ची मानसिक कुलाम झाली आहे. केवळ ३० सेकंदाची रील स्क्रोल करता करता या पिढीचे वाया जाणारी तासंतास आणि त्यातून त्यांच्यातील कमी होणारी एकाग्रता सामाजिक चिंतेचा विषय ठरत आहे.

एखाद्या हॉटेलमध्ये जेवण करायला गेल्यानंतर अगोदर समोर आलेल्या जेवणाचे फोटो काढून किंवा रिल्स काढुन स्टेटसला टाकेपर्यंत त्या जेवणाचा घास नरड्याच्या खाली उतरत नाही एवढी कठीण परिस्थिती आजच्या तरुणाईची झाली आहे. एवढ्यावरच ही पिढी थांबत नाही तर एखाद्या ठिकाणी अपघात झाला असेल तर अगोदर झालेल्या अपघाताचा व्हिडिओ बनवून सर्वांच्या अगोदर मी कसा व्हायरल करतो त्याच्यासाठी जीवाचा आटापिटा करणारी ही पिढी. सोशल मीडियावर इतरांची फिरतानाचे पार्ट्यांचे किंवा महागड्या वस्तूंचे फोटो पाहून मीच मागे राहिलोय का ही न्युनगंडाची भावना या पिढीमध्ये निर्माण होते आहे.

एखाद्याने एका गाण्यावर रिल्स बनवल्यानंतर बाकीचेही त्याच गाण्यावर रील्स बनवून वारंवार तोच व्हिडिओ टाकतात . (उदा. लाल लाल कलरची बांगडी बांगडी चा कलर लाल) ही रिल्स प्रचंड व्हायरल होताना दिसते, म्हणजेच प्रसिद्धीच्या या नादामध्ये इतरांची नक्कल करण्यात या तरुणाईने स्वतःची वैचारिक क्षमता सुद्धा गमावली की काय हा प्रश्न निर्माण होतो.एका घरामध्ये चार व्यक्ती एकाच सोप्यावर बसलेले असताना ते चारही जण रील्स स्क्रोल करण्यात एवढे मग्न असतात की त्यांना एकमेकांकडे पाहायला सुद्धा वेळ नसतो. सोशल मीडियाच्या या दुनियेमध्ये सायबर फ्रेंडशिप वाढली मात्र संकटाच्या वेळी पाठीवर हात ठेवणारा रियल मित्र हरवलाय हेही तेवढेच खरे आहे.

**आकाश डोंगरे**
बोरगाव मंजु मो. ९९२२३८८४३९

## कार्यालय नगर परिषद खामगाव

बस स्टँड जवळ, खामगांव जि. बुलडाणा - ४४४३०३

कार्यालय नगर परीषद खामगांव, जि. बुलडाणा, महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती व औद्योगीक अधिनियम १९६५ चे कलम ९९५ अन्वये जाहीर नोटीस.

याद्वारे नगर परीषद क्षेत्रातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, पावसाळा सुरु होणार असून पावसाच्या पाण्यामुळे किंवा इतर कारणांमुळे घरे पडून जिवीत किंवा वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता खामगांव शहरातील नागरीकांना महाराष्ट्र नगर परीषद नगर पंचायती व औदयोगीक अधिनियम १९६५ चे कलम १९३ (अ) अन्वये नगर परीषदेने परवानगी दिलेल्या ज्या इमारतींना ३० वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे. अशा इमारतीचे मालक किंवा भोगवटदार यांनी इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे. असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनासाठी (बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र) नगर परीषदेकडे नोंदणी केलेल्या अभियंता यांचेकडुन इमारतीची तपासणी करवुन घ्यावी. असे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र मुख्याधिकारी, नगर परीषद खामगांव यांचे कडे सादर करावे.

तसेच महाराष्ट्र नगर परीषद नगर पंचायती व औद्योगीक अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये खामगांव शहरातील ज्या इमारती भग्नावस्थेत असेल किंवा पडण्याचा संभव असेल किंवा अशा इमारतीस किंवा संरचनेत किंवा तिच्या शेजारच्या जागेस राहणाऱ्या आश्रय घेणाऱ्या किंवा तिच्या जवळुन येणाऱ्या जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तिच्यापासुन कोणत्याही रितीने धोका आहे. असे वाटत असेल तर संबंधित इमारत मालकाने ती ईमारत संरचना किंवा वास्तु पाडण्यास किंवा मजबुत करण्यास नगर परीषदेची परवानगी घेवुन कार्यवाही करावी. जेणेकरुन जिवीत, वित्त व इतर हानी होणार नाही. तरी उपरोक्त बाबींची सर्व नागरीकांनी नोंद घ्यावी. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही न केल्यास जिवीत. वित्त व इतर हानी झाल्यास संबंधित इमारत मालक, भोगवटदार यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

**(डॉ. प्रशांत शेळके)**
**मुख्याधिकारी, नगर परिषद खामगांव**

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. १९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# निविष्ठांचा काळा बाजार आढळल्यास कठोर कारवाई

## पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** खरीप हंगामासाठी जिल्ह्यात बी–बियाणे, खते आदी निविष्ठांची कुठेही कमतरता भासू नये यासाठी अचूक नियोजन ठेवा. निविष्ठांचा काळा बाजार कुठेही होता कामा नये अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिला.



पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक नियोजन भवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, हरिश पिंपळे, नितीन देशमुख, साजिदखान पठाण, किरण सरनाईक, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मुरली इंगळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, जिल्ह्यात खते, बियाणे आदी निविष्ठांची कुठेही उणीव भासू नये म्हणून नियोजन सादर करताना योग्य व परिपूर्ण आकडेवारी असावी. निविष्ठांची तालुकानिहाय आवश्यकता व उपलब्धता स्पष्ट असली पाहिजे. तालुका नियोजन करताना लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेतल्या पाहिजेत. तशी तयारी करून व मान्यवर लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन अचूक माहिती सादर करावी जेणेकरून राज्यस्तरीय बैठकीत पाठपुरावा करण्यात येईल. जिल्ह्यात सर्वदूर पुरवठा सुरळीत व्हावा. निविष्ठांचा काळाबाजार, लिंकिंग असे प्रकार झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

ते पुढे म्हणाले की, कृषी विभागाकडून वेळोवेळी होणा-या कार्यवाहींची माहिती शेतकरी बांधवांना वेळेत झाली पाहिजे. त्यासाठी जिल्हा वॉररूमसारख्या यंत्रणेचा वापर व्हावा. आपत्तीप्रसंगी पंचनामे करताना ते परिपूर्ण होतील व कुणीही आपत्तीग्रस्त वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. 'महावितरण'कडून वितरण रोहित्र (डीपी) संच तालुक्यात मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध ठेवावेत जेणेकरून गरज असेल तिथे ते वेळेवर पोचवता येतील व वीजपुरवठा तत्काळ सुरळीत होईल, असे निर्देश त्यांनी दिले. खरीप हंगामासाठी कर्जवितरणाला गती द्यावी. एकही पात्र शेतकरी वंचित राहता कामा नये, असेही निर्देश त्यांनी दिले.

बियाण्यांची उगवण न झाल्यास कंपनीवर तत्काळ कारवाई, शेतक-यांना वेळेत सूचना देणे, आदी निर्देश देण्यात आले. कृषी विभागाच्या सादरीकरणानुसार, खरीप हंगामासाठी ४ लक्ष ३७ हजार १०० हे. प्रस्तावित क्षेत्र आहे. बीटी कापूस बियाणे मागणी प्रती हे. ५ प्रमाणे कापसाचे संभाव्य क्षेत्रफळ १ लक्ष ४५ हजार हे. क्षेत्रफळासाठी ७ लक्ष २५ हजार पाकिटांची मागणी आहे. युरिया, डीएपी, एमओपी, संयुक्त खते, एसएसपी आदी खतांचे एकूण मंजूर आवंटन १ लक्ष १४ हजार २०० मे. टन आहे.

# दोन गोवंशांना जीवदान; २ लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १९ मे



**अकोट :** ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी सोमवारी पहाटे मोठी कारवाई करत कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या दोन गोवंशांची सुटका केली. या कारवाईत दोन बैलांसह मालवाहू वाहन असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन अकोट ग्रामीण हद्दीत पोलिस पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अंजनगाव रोडवरून अकोटकडे एका मालवाहू वाहनातून गोवंशाची वाहतूक केली जात आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी वाई फाट्याजवळ जिनिंगसमोर नाकाबंदी केली.

दरम्यान, अंजनगाव रोडकडून येणाऱ्या संशयित मालवाहू वाहनाला थांबविण्याचा इशारा दिला असता चालकाने वाहन शेतात घालून लपविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता दोन पांढऱ्या रंगाचे बैल निर्दयतेने कोंबून बांधल्याचे आढळून आले. जनावरांच्या चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले.

चालकाने आपले नाव शेख बिस्मिल्ला शेख हारुण (वय २४, रा. अजीजपुरा, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) असे सांगितले. चौकशीदरम्यान समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांनी संशयित वाहनासह दोन बैल आणि महिंद्रा सुप्रो (एमएच ३७ टी ३२५९) असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या गोवंशांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना पालनपोषणासाठी गोरक्षण संस्था, अकोट येथे दाखल करण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या पथकाने केली.

# भरदिवसा घरफोडी; बंद घराचे कुलूप तोडून दागिने-रोख रक्कम लंपास

**हिवरखेड :** येथे भुरट्या चोरांनी धुमाकूळ घालत सोमवारी भरदिवसा घरफोडी केल्याची घटना समोर आली आहे. मराठा नगर परिसरातील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी जवळपास ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे.

हिवरखेड येथील मराठा नगर परिसरात राहणारे रुपराव जानराव गावंडे यांच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारला. १७ रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम लंपास केली.




या चोरीमध्ये सहा ग्रॅमची सोन्याची पोत, दोन ग्रॅमची अंगठी, तीन ग्रॅमची रिंग, सोन्याची नथ तसेच इतर दागिने आणि नऊ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ९८ हजार ६१ रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय गोपाल गिलबिले हे पुढील तपास करीत आहेत. चोरीचा उलगडा करण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जात असून फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.दरम्यान, हिवरखेड व परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी अकोट बसस्थानक परिसरात एका महिलेचे दागिने चोरीला गेले होते, तर सोमवारी काळी-पिवळी बसस्थानक परिसरातील हॉटेलमधून एका महिलेचा महागडा मोबाईलही चोरीला गेल्याची घटना घडली होती. या सलग घटनांमुळे पोलिसांनी गस्त वाढवून चोरट्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# टंचाई असूनही शहरात शुद्ध पाण्याचा अपव्यय

**अकोला :** शहरात सहा दिवसांनंतर पाणी पुरवठा होत असला तरी ज्या दिवशी ज्या भागात नळ येतात, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शुद्ध पाण्याचा अपव्यय होताना दिसत आहे. नळ येताच अनेक नागरिक घराच्या पायऱ्यापासून ते दुचाकी, चारचाकी वाहने धुवून काढतात. तसेच काही नागरिक आपल्या पाळीव प्राण्यांनाही याच पाण्याने आंघोळ घालत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शुद्ध पाण्याचा अपव्यय होत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे मनपा व जिल्हा प्रशासनाने जलसाठ्याचे बाष्पीभवन होत असल्याने पाणी जपून वापरावे.

# राज्यातील माळी समाजातील नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा



**अकोट :** माळी विकास मिशन आयोजित माळी समाजातील राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील सर्व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा व प्रबोधन शिबिर २०२६ चे उदघाटन ह.भ.प. सावता महाराज वसेकर, आमदार योगेश अण्णा टिळेकर यांचे हस्ते होणार आहे

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री नामदार, जयकुमार गोरे, बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांचे शुभहस्ते हा सत्कार सोहळा पार पडणार आहे .यावेळी श्री. महेश झगडे सेवानिवृत्त ख-ड शेखर गायकवाड सेवानिवृत्त ख-ड यांचे मार्गदर्शन होणार आहे तर यावेळी खा. डॉ. अमोल कोल्हे, मा. आ.उमेश उर्फ चंदू यावलकर, आ. डॉ. प्रज्ञाताई सातव, मा. आ.कपिल पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# नीट पेपर फूट प्रकरणी काँग्रेसची निदर्शने

**अकोला :** नीट पेपर फुट प्रकरणी युवक काँग्रेस च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यलय समोर तीव्र स्वरूपाचे निर्देशने करण्यात आली, या वेळी केंद्रीय शिक्षण मंत्री यांचा निषेध करण्यात आला, नीट पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री यांनी तात्काळ राजीनामा द्यावा तसेच या प्रमाणात दोषी असणाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी या वेळी आंदोलकांनी केली होती.

या आंदोलनात आमदार साजिद खान पठाण यांच्या सह मोठ्या संख्येने काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते सहभागी होते. या वेळी केंद्रीय शिक्षण मंत्री यांचा प्रतिकात्मक फोटोचे दहन करून आंदोलकांनी आपला रोष व्यक्त केला.

# आकाश कोचिंग क्लासेसच्या ७० विद्यार्थ्यांनी आयआयटीसाठी परीक्षा दिली


## आकाशचा जेईई मेन परीक्षेचा निकाल अकोल्यात सर्वोत्तम

प्रतिनिधी १९ मे



**अकोला :** आकाश कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी जेईई मेन परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवले. जेईई मेन २०२६ परीक्षेत आकाशच्या ४३ विद्यार्थ्यांनी ९० टक्के वर गुण प्राप्त केले.

४१ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के वर तर ४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के वर गुण मिळवून यशाची पताका फडकवली. १७ मे रोजी ७० विद्यार्थ्यांनी आय आय टी प्रवेशासाठी परीक्षा दिली. आकाशचे सिनीयर असिस्टंट डायरेक्टर रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या होत्या.



आकाश कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश डोळ्यात भरणारे आहे. जेईई मेन परीक्षेत ४३ विद्यार्थ्यांनी ९० टक्के वर, ४१ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के वर तर ४ विद्यार्थ्यांनी ९९ टक्केवर गुण मिळवून यशाचे शिखर गाठले. १७ मे रोजी आकाश च्या ७० विद्यार्थ्यांनी आय आय टी प्रवेशासाठी परीक्षा दिली. हे सर्व विद्यार्थी आणि पालकांना यशाच्या शुभेच्छा दिल्या असे आकाशचे सिनीयर असिस्टंट डायरेक्टर रेड्डी यांनी सांगितले.

# हिवरखेडमध्ये जनगणनेला वेग



प्रतिनिधी १९ मे

**हिवरखेड :** येथे जनगणना कार्याला वेग आला आहे. यामध्ये नगरपरिषदचे कर्मचारी, शिक्षक, प्रवेशक,अधिकारी अशा प्रकारे प्रगणक आहेत. लोकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित केली जात आहे. सुरूवातीला विविध भागात घरांना क्रमांक देण्यात आले. त्यानंतर आता माहिती घेतली जात आहे. नागरिकांनी योग्य माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

# हरवलेल्या महिलेविषयी माहिती द्या



**अकोला :** येथील डाबकीरोड इंदिरा नगर मधील रहिवासी सुनंदा उमेश महाजन (६५) ह्या २५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी घरून निघून गेल्या. कुटुंबीयांनी आजुबाजूला तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. परंतु काहीही पत्ता लागला नाही. त्यामुळे उमेश रघुनाथ महाजन यांनी २६ एप्रिल २६ रोजी डाबकी रोड पोलिस स्टेशनला हरवल्याची तक्रार दिली. सुनंदा महाजन यांचा रंग निमगोरा, उंची ५ फूट, डोक्याचे केस काळे, नाक सरळ, डोळे बारीक, बांधा सडपातळ, अंगात हिरव्या रंगाची साडी, पायात निळ्या रंगाची चप्पल आहे. या महिलेबाबत माहिती मिळाली तर डाबकीरोड पोलिस स्टेशनला ०७२४-२४४५३४० क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन केले आहे.

# नीट पेपरफुट प्रकरणी अकोल्यात मनसेचे आंदोलन

## आरसीसी कोचिंग क्लासच्या बोर्डाला फासले काळे

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आरसीसी कोचिंग क्लासचे संचालक मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर अकोल्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आरसीसी कोचिंग क्लाससमोर आंदोलन करत संस्थेच्या बोर्डाला काळे फासत तीव्र निषेध व्यक्त केला. या प्रकरणाची सीबीआयमार्फत सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.


सीबीआयने आरसीसी कोचिंग क्लासचे संचालक मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना अकोला शहराच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. अकोला शहरातील आरसीसी मोटेगावकर कोचिंग क्लाससमोर मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते. यावेळी आंदोलकांनी कोचिंग क्लासच्या बोर्डाला काळे फासत मोटेगावकर यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सीबीआयने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

# मुख्य रस्त्यांवरील अडथळ्यांवर प्रशासनाचा बडगा

**अकोट :** शहरातील वाढत्या अतिक्रमणामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि मान्सूनपूर्व नालेसफाईतील अडथळे लक्षात घेता अकोट नगर परिषदेकडून व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिजामाता चौक या प्रमुख मार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई करत प्रशासनाने मुख्य रस्ते मोकळे करण्यास सुरुवात केली.

नगर परिषद, महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही मोहीम राबविली. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी स्वतः उपस्थित राहून कारवाईची पाहणी केली. रस्त्याच्या दुतर्फा उभारण्यात आलेली तात्पुरती अतिक्रमणे, फेरीवाल्यांच्या अनधिकृत मांडण्या तसेच वाहतुकीस अडथळा ठरणारे साहित्य हटविण्यात आले.



शहरातील मुख्य बाजारपेठ व गर्दीच्या भागांत अतिक्रमणामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत होत्या. रस्त्यांची रुंदी कमी झाल्याने नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. तसेच आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

दरम्यान, शासनाच्या जागांवर अतिक्रमण करून त्या भाड्याने देत आर्थिक व्यवहार करणाऱ्यांची माहितीही प्रशासनाकडून गोळा करण्यात येत आहे. सार्वजनिक जागांचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून शहरातील नाल्यांवरील अतिक्रमण हटवून तातडीने नालेसफाई करण्यावर भर देण्यात येत आहे. अनेक ठिकाणी नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा धोका वाढला असल्याने ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

वाहतूक सुरळीत ठेवणे, पादचाऱ्यांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे आणि नागरिकांचा त्रास कमी करणे हा मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. पुढील काही दिवस शहरातील विविध भागांत ही मोहीम सुरू राहणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अकोट शहर पोलीस स्टेशन ते अकोला नाका मार्गावर काही चारचाकी गॅरेजसमोर रस्त्यावरच वाहन दुरुस्तीचे काम केले जात असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत असून नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अशा गॅरेजसमोरील अतिक्रमणावरही कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १९ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# गळा चिरून महिलेची निर्घृण हत्या; संशयित पती ताब्यात

## अनैतिक संबंधातून घडले हत्याकांड, गोपालपूर हादरले

प्रतिनिधी १९ मे

**यवतमाळ** : जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील गोपालपूर येथील कोलाम पोड परिसरात विभक्त राहणाऱ्या एका महिलेची गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवारी उघडकीस आली. कौटुंबिक वाद आणि संशयातून हा खून झाल्याची शक्यता व्यक्त केली जात असून पोलिसांनी महिलेच्या पतीला संशयित म्हणून ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि खळबळ पसरली आहे.



कमलाबाई हुसेन मेश्राम (वय ५१) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या गोपालपूर येथील कोलाम पोड परिसरात स्वतंत्र राहत होत्या. त्यांचे पती हुसेन गड्डू मेश्राम (५७) यांच्यासोबत गेल्या काही दिवसांपासून सतत वाद होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. पत्नीवर संशय घेतल्यामुळे घरात नेहमी भांडणे होत असत. त्यामुळे मानसिक त्रासाला कंटाळून कमलाबाई यांनी पतीपासून वेगळे राहत स्वतंत्र वास्तव्य सुरू केले होते. त्या पतीच्या घरापासून अवघ्या दोन घरांच्या अंतरावर राहत होत्या.

सोमवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास गावातील सदाशिव वाघधरे यांच्या घराच्या अंगणात एका महिलेचा मृतदेह पडल्याची माहिती ग्रामस्थांनी मृत महिलेचे भाऊ चंद्रभान आत्राम यांना दिली. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता कमलाबाई रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने खोल वार करण्यात आल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

मृत महिलेच्या भावाने दिलेल्या माहितीनुसार, कमलाबाई यांचे दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध असल्याचा संशय पतीला होता. त्यावरून तो वारंवार पत्नीशी वाद घालत असे. त्यामुळे संशयातूनच ही हत्या घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, ही घटना रविवारी मध्यरात्री ते सोमवारी पहाटेदरम्यान घडल्याचा अंदाज आहे. माहिती मिळताच पोलीस पाटील रमेश कुंटलवार यांनी पांढरकवडा पोलिसांना कळविले. त्यानंतर पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून पुरावे संकलित केले असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची पाहणी केली.

या प्रकरणी पोलिसांनी हुसेन मेश्राम यांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. हत्या नेमकी कोणत्या कारणातून झाली, याचा तपास सुरू असून कौटुंबिक वाद, संशय आणि इतर वैयक्तिक कारणांच्या अनुषंगाने पोलिस विविध बाजूंनी चौकशी करत आहेत. शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक तपासानंतर प्रकरणातील अधिक तपशील स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# गोवंशाने भरलेला आयशर पकडला


## सहा जनावरे मृतावस्थेत; २३.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १९ मे

**यवतमाळ** : गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या आयशर वाहनावर वडकी आणि राळेगाव पोलिसांनी संयुक्त कारवाई करत २५ गोवंशांची सुटका केली. यामध्ये सहा जनावरे मृतावस्थेत आढळून आली. पोलिसांनी २३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला.

गोवंश भरून एक आयशर वाहन राळेगावकडून वडकीकडे येत असल्याची माहिती वडकी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी उमरेड टोल नाक्यावर तातडीने नाकाबंदी केली. मात्र पोलिसांचा बंदोबस्त पाहून संबंधित वाहनचालकाने वाहन टोलमार्गाने न आणता खेडेगाव मार्गे रिधोरा गावाकडून विहीरगावच्या दिशेने नेले.



यानंतर वडकी पोलिसांनी जलद हालचाल करत विहीरगाव चौफुलीवर रस्ता अडविला. त्याचवेळी राळेगाव पोलिसांचे वाहनही आयशरचा पाठलाग करीत होते. दोन्ही बाजूंनी कोंडी होत असल्याचे लक्षात येताच चालकाने एमएच-४०-बीजी-८७४४ क्रमांकाचे आयशर रस्त्यावर सोडून अंधाराचा फायदा घेत पलायन केले.

पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २५ गोवंश आढळून आले. त्यापैकी सहा जनावरे मृतावस्थेत होती, तर १९ जनावरे जिवंत होती. जिवंत जनावरांवर प्राथमिक उपचार करून त्यांना गोवंशाळेत दाखल करण्यात आले.

या कारवाईत ३ लाख ८० हजार रुपये किमतीचे गोवंश आणि २० लाख रुपये किमतीचे आयशर वाहन असा एकूण २३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांवरील क्रूरतेस प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वडकीचे ठाणेदार सुखदेव भोरकडे, पोलीस कर्मचारी निलेश वाढई, सुरेश नगराळे, चालक दीपक मडकाम तसेच राळेगाव येथील सहायक पोलीस निरीक्षक योगेश दंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास वडकी पोलीस करीत आहेत.

# सराईत गुन्हेगार ताब्यात; जबरी चोरीसह दुचाकी चोरीची कबुली

प्रतिनिधी १९ मे

**यवतमाळ** : शहरातील वाढत्या घरफोडी, दुचाकी चोरी आणि जबरी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने सराईत गुन्हेगाराला ताब्यात घेऊन ५३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चोरीतील रोख रक्कम आणि ॲक्टिव्हा दुचाकी हस्तगत करण्यात आली.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी संपत्तीविषयक गुन्ह्यांचा समांतर तपास करून गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार १७ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यवतमाळ उपविभागात पेट्रोलिंग करत होते. यावेळी गोपनीय माहितीदारामार्फत सराईत गुन्हेगार अक्षय



दयाराम मसराम (२८, रा. नेताजी नगर, यवतमाळ) हा तायडे नगर परिसरात चोरीचा मुद्देमाल विक्रीसाठी फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ३ हजार २०० रुपयांची रोख रक्कम आणि अंदाजे ५० हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा मोपेड (एमएच २९ बीएक्स १०५४) जप्त केली. एकूण ५३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून आरोपीला पुढील कारवाईसाठी अवधूतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, पोउपनि गजानन राजमल्लू, शिवशंकर कायंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# सिद्धेश्वर नगरात पुन्हा घरफोडी; सोने-चांदीसह रोख रक्कम लंपास

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

प्रतिनिधी १९ मे

**उमरखेड** : शहरातील सिद्धेश्वर नगर, बोरबन परिसरात पुन्हा एकदा धाडसी घरफोडीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे ७२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

संतोष देवराव तालंगकर हे मुलांच्या जेईई परीक्षेनिमित्त नांदेड येथे गेले होते. परीक्षा संपल्यानंतर ते नातेवाईकांकडे मुक्कामी थांबले होते. या संधीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या सिद्धेश्वर नगर येथील राहत्या घरावर डल्ला मारला. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील साहित्य अस्ताव्यस्त फेकून शोधाशोध केली. यामध्ये सुमारे दहा ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीची चैन तसेच गल्ल्यातील आणि घरातील मिळून मोठी रोख रक्कम चोरून नेल्याचे उघड झाले आहे. रविवारी सकाळी सहाच्या सुमारास शेजाऱ्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी तत्काळ संतोष तालंगकर यांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर ते सकाळी नऊच्या सुमारास उमरखेड येथे पोहोचले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. विशेष म्हणजे, याच परिसरात एक दिवसापूर्वीच तीन घरांचे कुलूप तोडून चोरीचे प्रयत्न करण्यात आले होते. मात्र त्यावेळी चोरट्यांच्या हाती काहीच लागले नव्हते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याच भागात यशस्वी घरफोडी झाल्याने पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून रात्रीची पोलीस गस्त



वाढवावी, संशयितांवर लक्ष ठेवावे आणि परिसरात सीसीटीव्ही तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. संबंधित चोरट्यांचा लवकरच शोध घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी नागरिकांना दिले.

# महाराजस्व समाधान शिबिरात लाभार्थ्यांना ३ लाख १६ हजार दाखले, प्रमाणपत्र वितरित

प्रतिनिधी १९ मे

**यवतमाळ** : राज्य शासनाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यातील १०९ मंडळांमध्ये ७ मार्च ते १५ मे या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात आले. याअंतर्गत आयोजित शिबिरांना सर्वच मंडळात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या समाधान शिबिराअंतर्गत आतापर्यंत विविध प्रकारचे ३ लाख १६ हजार ७१८ दाखले व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपजिल्हाधिकारी पुनम अहिरे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम व पत्रकार बांधव उपस्थित होते.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील शिबिरामध्ये आरोग्य, शिक्षण, पोलीस, पशुसंवर्धन, कृषी आदी २२ विभाग एकाच छताखाली आणून लाभार्थ्यांना योजनेची माहिती व लाभ देण्यात आला. तसेच आतापर्यंत झालेल्या सर्वच शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा देण्यात आल्या. त्यामध्ये ११०५६ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आले, ४६६८ सातबारमधील दुरुस्ती अर्ज स्विकारण्यात आले, ६६,७७५ डिजिटल सातबारा, ४९,०६६ नमुना ८ अ उतारे उपलब्ध करुन देण्यात आले. १,४०,२२७ प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत ३०,५५८ अर्ज निकाली काढण्यात आले.

# गांजाची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक

## पुसद ग्रामीण पोलिसांची कारवाई; २.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १९ मे

**पुसद** : अमली पदार्थांविरोधातील मोहिमेत पुसद ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत दोन जणांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून ८.७०० किलो गांजा, दोन दुचाकी आणि मोबाईलसह एकूण २ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच



पार्श्वभूमीवर १६ मे रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पुसद यांच्या पथकाला येलदरीकडून पुसदकडे गांजाची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी येलदरी फाटा येथे सापळा रचला. यावेळी एमएच-२६-सीएच-२००३ क्रमांकाची दुचाकी संशयावरून थांबवून चालकाची चौकशी करण्यात आली. त्याने आपले नाव शेख जाकीर शेख जाफर (वय ३५, रा. रहीमनगर, उमरखेड, ह.मु. माहूर, जि. नांदेड) असे सांगितले. झडतीदरम्यान त्याच्याकडून गांजाची पाकिटे जप्त करण्यात आली.

अधिक चौकशीदरम्यान हा गांजा शेख एजाज याच्याकडून आणल्याची माहिती आरोपीने दिली. त्यानंतर पोलिसांनी शेलू बु., जि. वाशिम येथे जाऊन शेख सलीम एजाज अब्दूल सईद (वय ३८, रा. मंगलवारी बेस, वाशिम) याला ताब्यात घेतले. त्याच्या दुचाकीची झडती घेतली असता त्याच्याकडेही गांजा आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी ८.७०० किलो गांजा किंमत २ लाख १७ हजार ५०० रुपये, दोन दुचाकी किंमत ६० हजार रुपये तसेच दोन मोबाईल असा एकूण २ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी बी. जे. हर्षवर्धन यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष चौधरी, राहुल देशमुख, दीपक उईके यांच्यासह पुसद ग्रामीण पोलिसांचे पथक सहभागी होते.

# नीट परीक्षेतील गैरप्रकारांवर संताप

## दोषींवर कठोर कारवाईची दिग्रसकर संघटनेची मागणी

प्रतिनिधी १९ मे

**दिग्रस** : देशातील वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वाची मानली जाणारी नीट (NEET-UG 2026) परीक्षा यंदा कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांमुळे वादाच्या केंद्रस्थानी आली आहे. या प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

३ मे २०२६ रोजी झालेल्या परीक्षेनंतर पेपरफुटी आणि गैरव्यवहाराचे आरोप समोर आल्यानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) ने १२



मे रोजी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. तसेच २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (CBI) तपासात या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू आहे. काही कोचिंग नेटवर्क आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित व्यक्तींवर संशय व्यक्त करण्यात येत असल्याने तपास अधिक गतीने सुरू आहे. या तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

या पार्श्वभूमीवर 'आम्ही दिग्रसकर संघटना'ने केंद्र सरकारकडे निवेदन सादर करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही सवलत देऊ नये तसेच जलदगती न्यायालयात खटले चालवून कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

परीक्षेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत असल्याचे नमूद करत, यंदाच्या बारावीच्या गुणवत्तेनुसार वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेचा पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये अधिक सक्षम आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नीट परीक्षा प्रकरणामुळे देशातील शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून, या घोटाळ्यातील दोषींवर केंद्र सरकार आणि तपास यंत्रणा कोणती भूमिका घेतात, याकडे विद्यार्थ्यांसह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# 'बायोचार'वर शेतकरी मार्गदर्शन मेळावा

प्रतिनिधी १९ मे

**राळेगाव** : तालुक्यातील जळका येथे सारथी संस्थेच्या वतीने "शाश्वत शेती व शेतीमध्ये बायोचारचा उपयोग" या विषयावर शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा २३ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता होणार असून परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मेळाव्यात बायोचारच्या वापरामुळे मातीची सुपीकता कशी वाढते, उत्पादन खर्च कसा कमी होतो तसेच पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करून शाश्वत शेती कशी साध्य करता येते, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीतील उत्पन्नवाढ आणि जमिनीची गुणवत्ता सुधारण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी सुहास भेंडे, मंडळ कृषी अधिकारी राजू ताकसांडे, सारथी संस्थेचे अध्यक्ष शेख रसूल तसेच सचिव शितल ठाकरे हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय प्रगतशील शेतकरी मंदार देशमुख, डॉ. कुणाल भोयर, सरपंच सुशिलाताई तुमराम आणि उपसरपंच संजय पांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन सारथी संस्था यांच्या वतीने करण्यात आले असून मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन किशोर पाल यांनी केले आहे.

# रखरखत्या उन्हात बळीराजा शेतात; भुईमूग काढणीला वेग

प्रतिनिधी १९ मे

**यवतमाळ** : विदर्भात तापमानाने ४४ अंशांचा टप्पा गाठला असतानाही बळीराजा मात्र शेतात राबताना दिसत आहे. यवतमाळ जिल्ह्यासह परिसरात सध्या उन्हाळी भुईमूग काढणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी कडक उन्हातही दिवसभर शेतात घाम गाळत आहेत.



भुईमूग उपटणे, झाडांपासून शेंगा वेगळ्या करणे तसेच वाळवणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. ग्रामीण भागात शेतकरी आणि मजूर रखरखत्या उन्हात मेहनत करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. उष्णतेमुळे काढणी आणि मळणीची कामे अधिक कष्टदायक ठरत असून अनेक ठिकाणी कामगारांनाही त्रास सहन करावा लागत आहे. अंगाची लाही लाही करणाऱ्या तापमानातही पिके सुरक्षित हातात यावीत आणि मेहनतीचे चीज व्हावे यासाठी शेतकरी जीवाचे रान करत आहेत. उन्हाळी हंगामात पाण्याची टंचाई, वाढते तापमान आणि मजुरीचा खर्च या अडचणींवर मात करत शेतकरी भुईमूग उत्पादन टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. दरम्यान, बाजारात भुईमूगला सध्या प्रतिक्विंटल सुमारे ८ हजार १३० रुपयांपर्यंत भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. उत्पादन चांगले मिळाल्यास आर्थिक गणित जुळून येण्याची अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. भुईमूग हे बहुउपयोगी नगदी पीक मानले जाते. या पिकापासून तेल, विविध खाद्यपदार्थ, जनावरांसाठी सकस चारा तसेच पौष्टिक पेंड तयार केली जाते.

टरफलापासून सेंद्रिय खतही बनविले जाते. कमी खर्च, तुलनेने चांगले उत्पादन आणि समाधानकारक बाजारभाव यामुळे अलिकडच्या काळात अनेक शेतकरी भुईमूग लागवडीकडे वळताना दिसत आहेत.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी झरीजामणी यांचे कार्यालय,**

क्रमांक/अका/ प्रस्तु 2/कावी/31/2026

दिनांक 26/02/2026

**जाहीरनामा**

प्रकरणात ग्राम पंचायत अधिकारी निंबादेवी यांनी साहील शंकर पेंदोर रा. निंबादेवी यांची **जन्म दि. 13/06/2011** रोजी मौजा निंबादेवी येथे झाला असून त्यांची जन्माची नोंद त्यावेळी ग्रामपंचायतला माहिती अभावी केली नसल्याने जन्म नोंदणी अभिलेखामध्ये नोंद उपलब्ध नाही. सबब सदर तारखेची जन्माची नोंद ग्राम पंचायत निंबादेवी येथील जन्म नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करावा. याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे.

करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती यांचे **जन्म दि. 13/06/2011** ची नोंद ग्रामपंचायत निंबादेवी येथील जन्म नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.

याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**(अक्षय रासने)**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**झरीजामणी**

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. १९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती आयटीआयमध्ये सोमवारी शिकाऊ उमेदवार भरती मेळावा

**अमरावती:** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे सोमवार, दि. २५ मे रोजी सकाळी १० वाजता भव्य शिकाऊ उमेदवार भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा संस्थेच्या एनएसएस हॉलमध्ये पार पडणार आहे. अमरावती जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण, तसेच सध्या अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना यात सहभागी होता येणार आहे. यात फिटर, टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, डिझेल मेकॅनिक, मोटर मेकॅनिक व्हेइकल, वायरमन, इलेक्ट्रीशियन, आरएसी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणार्थी सहभागी होऊ शकतील. या भरती प्रक्रियेसाठी नागपूर आणि पुणे येथील कंपन्या उपस्थित राहणार आहे. उमेदवारांनी मेळाव्याला येताना आपला अद्ययावत बायोडाटा आणि सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील आयटीआय उत्तीर्ण आणि अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांनी याच लाभ घ्यावा, असे आवाहन आयटीआयचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार यांनी केले आहे.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी सतर्क राहावे- विभागीय आयुक्त नयना गुंडे

◆ जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष 24 x 7 तास कार्यान्वित ठेवा ◆ विभागीय मान्सून पूर्वतयारी आढावा ◆ ‘एल निनो’ च्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहावे

प्रतिनिधी १९ मे

**अमरावती:** पावसाळ्यात पुरामुळे बाधित होणाऱ्या गावांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात. पुरग्रस्त, संपर्क तुटणाऱ्या गावांत तसेच आदिवासी क्षेत्रातील दुर्गम गावांत तत्काळ मदत पोहोचण्याच्यादृष्टीने प्रभावी नियोजन करावे. त्यासाठी सर्व स्तरांवरील संपर्क यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, बचाव पथके २४ तास कार्यान्वित ठेवून जिल्हा प्रशासनाने व संबंधित यंत्रणांनी नेहमी सतर्क राहावे, असे निर्देश विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिले. आपत्तीच्या प्रसंगावेळी नागरिकांना संपर्क साधण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मदत पथकांचे संपर्क क्रमांक सर्व माध्यमांव्दारे जाहिर करावे, असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत विभागीय आयुक्तांनी मान्सून पूर्व तयारीबाबत जिल्हा प्रशासनाकडून आज आढावा घेतला. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, कृषी सहसंचालक गणेश घोरपडे प्रत्यक्षरित्या तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रमुख दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.



विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे म्हणाल्या की, आगामी पावसाळ्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने मान्सून पूर्वतयारी व अनुषंगीक उपाययोजना आपापल्या जिल्ह्यात करुन ठेवावी. पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे व पुरामुळे काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने बाधितांसाठी उंच ठिकाणी निवारा, भोजन व्यवस्था तसेच धान्य, औषधींचा साठा आदी मुलभूत सामुग्रींची तजवीज आधीच करून ठेवावी. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार फैलू नयेत यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासण्याबरोबरच आवश्यक तिथे पर्यायी व्यवस्था करावी. पावसाळ्यात येणाऱ्या साथ रोगांपासून तसेच विंचू दंश, सर्प दंशापासून बचावासाठी आरोग्य विभागाने प्रत्येक आरोग्य केंद्रात इंजेक्शन व पुरेसा औषधी साठा उपलब्ध करुन द्यावा. अवकाळी पावसानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी ‘महावितरण’ने प्रभावी नियोजन करावे. जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष २४७७ नेहमी कार्यान्वित ठेवावीत. ‘एसडीआरएफ’ तसेच ‘एनडीआरएफ’ची बचाव पथके स्थापन करुन बोट, लाईफ जॅकेट, दोरखंड आदी आवश्यक साहित्यानिशी सुसज्ज ठेवावी. बचाव पथकांचे प्रशिक्षण व मॉकड्रीलही जिल्हा प्रशासनाने घ्याव्यात. ‘एल निनो’ च्या पार्श्वभूमीवर आवश्यक सर्व उपाययोजना जिल्हा प्रशासनाने कराव्यात, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

त्या पुढे म्हणाल्या की, प्रत्येक विभागाने आपापली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. आदिवासी दुर्गम गावांतील गरोदर मातांची काळजी घेण्यासाठी जवळपासच्या आरोग्य केंद्रात आवश्यक उपाययोजना करुन ठेवाव्याबाबत आरोग्य विभागाला सूचना केल्या. ब्रिटीशकालीन तलावांच्या नियंत्रणाबाबत जिल्हा परिषद प्रशासन व जलसंधारण विभागाने गाळ काढणे, संरक्षणात्मक बाबींची जाणीवपूर्वक कार्यवाही करावी. ग्रामीण भागात नदी खोलीकरण व पुर संरक्षण भिंतीची तपासणी व आवश्यकतेनुरुप दुरुस्त्या आताच करुन घ्याव्यात. महापालिका, नगरपालिका प्रशासनाने संबंधित शहरातील नाल्यांची साफ-सफाई व स्वच्छता, डासांचा प्रतिबंध आदी कामे तातडीने पूर्ण करावी. जीर्ण व शिकस्त असलेल्या जिल्हा परिषद शाळा व ईमारतींचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेबाबत खातरजमा करावी. धरणातील जलसाठ्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करावे. नदीकाठावरील गावांत धोकादायक ठिकाणी (ब्लू लाईन, रेड लाईन) सीमांकन करावे. तसेच पूर प्रतिबंधक समिती स्थापन करावी. धरणातील पाणी सोडताना तहसीलदार, पोलीस व कंट्रोलरूमला २४ तास आधी कळवावे. सर्व प्रकल्पांची तातडीची दुरुस्ती करून घ्यावी. दुर्गम भागातील संपर्क न होऊ शकणाऱ्या ठिकाणी बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करावी. हवामान खात्याकडून इशारे प्राप्त होताच सर्वदूर माहिती जलद गतीने पोहोचवावी, असेही निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील संभाव्य पूरबाधित तसेच दुर्गम गावे, बचाव पथकांसाठी मोटर बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग्ज, रोप बंडल, सर्च लाईट, मेगा फोन, ग्लोव्हज, रेनकोट, स्कूबा डायव्हिंग कीट, हेल्मेट आदी विविध साधने, बचाव पथकांची मॉक ड्रिल, संरक्षित निवारा व भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी, विज पुरवठा, नियंत्रण कक्ष, विजेचे संकेत देणारे दामिनी ?प, नदी-नाल्यांची सफाई व खोलीकरण आदी बाबीं संदर्भात पूर्वतयारी संबंधित जिल्हाप्रमुखांनी आताच करुन घ्यावी तसेच वेळोवेळी यासंदर्भात आढावा घ्यावा, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील पावसाची आकडेवारी, जिल्ह्यातील मुख्य नद्या व नदीकाठावरील गावे, पूराचा धोका असणारी गावे, हवामानाचा अंदाज वर्तविणारी केंद्र, शोध व बचाव पथके, कुशल मनुष्यबळ, प्रथमोपचार किट, औषधींचा साठा, जिल्हा नियंत्रण कक्ष, पूर नियंत्रण यंत्रणा, प्रकल्पातून होणारा पाण्याचा विसर्ग, बांधितांसाठी अन्न, भोजन, निवारा, औषधींचा साठा आदी बाबींसंदर्भात श्रीमती गुंडे यांनी सविस्तर आढावा घेतला. तसेच आगामी खरिप हंगामाबाबत व मान्सूनपूर्व तयारी संबंधी कृषी विभागाने केलेले नियोजन याबाबतही त्यांनी आढावा बैठकीत घेतली.

# महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहावे

◆ ॲड. भूषण खंडारे यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी १९ मे

**दर्यापूर :** भारतीय जनता पार्टी पदाधिकारी नात्याने चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री अमरावती जिल्हा यांना निवेदन सादर करण्यात आले.

वीज महावितरण कंपनी दर्यापूर येथे उपमुख्य कार्यकारी अभियंता काटोळे हे कार्यरत असून शासकीय नियमानुसार दर्यापूर मुख्यालयीन राहणे हे बंधनकारक असून ते अमरावती वरून येणे जाणे करतात त्यांच्या मनानुसार केव्हाही येतात



त्यांच्यावर वेळेचे पाबंदी नाही कार्यालयात विचारले असता साहेब अमरावती मीटिंगमध्ये आहे या प्रकारे उत्तर दिल्या जाते दर्यापूर मधील विज विद्युत प्रवाह नेहमी खंडित होणे, मान्सूनपूर्व झाडांच्या फांद्या छाटणी करणे तसेच नागरिकांच्या बिलांच्या समस्या सोडविणे व जिल्हा नियोजन फंडातून आलेल्या कामात हलकर्जी पणा करणे वेळेत काम पूर्ण नकरणे मुख्य म्हणजे इतर विभागातील ज्युनियर अभियंता यांच्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नाही फोन लावले असता फोन उचलत नाही भारतीय जनता पार्टी पदाधिकारी आले. असतात त्यांना भेटण्यास टाळाटाळ करणे उडवाउडवीचे उत्तर देणे अशा प्रकारचे कृत्य त्यांच्याकडून होत आहे व यांच्या वागणुकीमुळे नागरिक व पदाधिकारी त्रस्त झाले आहे. तरी यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई होणे हे गरजेचे आहे. तरी आपल्या तर्फे शिस्त भागाची कारवाई होण्या बाबत निर्देश वरिष्ठांना देण्याबाबत भारतीय जनता पार्टीच्या वतीने मेघा भारती , मदन पाटील बायस्कर. ॲड भूषण खंडारे, विजय मेंढे बाळासाहेब वानखडे, गोपाल चंदन, उमेश नाकट ,स्वप्निल गावंडे, नकुल सोनटक्के, यांच्या वतीने निवेदन देण्यात.

# मेळघाट विकासासाठी प्रशासनातील समन्वय वाढवावा-मंत्री डॉ. अशोक उईके

प्रतिनिधी १९ मे

**अमरावती:** चिखलदरा आणि धारणी हे आदिवासी बहूल तालुके दत्तक घेतलेले आहेत. त्यामुळे या भागाच्या विकासकामांना गती देऊन नागरिकांच्या मुलभूत समस्या दूर करण्यासाठी प्रकल्प कार्यालयाने सर्व विभागांशी समन्वय ठेवावा. यामुळेच त्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे मत आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केले.



मंत्री डॉ. उईके यांच्या अध्यक्षतेखाली धारणी येथे आढावा बैठक पार पडली. बैठकीत कुपोषण, सिकलसेल, थॅलेसेमिया आणि क्षयरोग या गंभीर विषयांवर स्वतंत्रपणेचर्चा करण्यात आली. आदिवासी भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता, वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे आणि उपचार सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या क्षेत्रातील सिकलसेल आणि कुपोषणमुक्त करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कुपोषणमुक्तीसाठी पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सक्त सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

मंत्री डॉ. उईके यांनी, आदिवासी क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रत्येकाने कार्य करणे गरजेचे आहे. शासनाची कामे प्रत्यक्षात दिसली पाहिजेत. त्यासोबतच नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती प्रकल्प कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच योजनांच्या लाभासाठी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि लाभार्थ्यांची यादी अनिवार्यपणे लावण्यात यावी.

बिरसा मुंडा कृषी योजनेत शेतकऱ्यांना विहिरीसोबतच सोलार सिस्टीम, पाईपलाईन, स्प्रिंकलर आणि मोटार पंपही देण्यात यावेत. यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना पूर्ण लाभ मिळू शकेल. कृषी विद्यालयातील रिक्त पदे आणि इमारतीसाठी प्रयत्न करण्यात येतील. शासकीय आश्रम शाळांतील सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. खारी आश्रमशाळा येथे वीज कनेक्शन आणि कमी दाबाच्या विजेची समस्या जाणवत आहे. याबाबत आश्रमशाळा आणि वसतिगृहांना स्वतंत्र डीपी बसविण्याचे निर्देश महावितरणला देण्यात आले. तसेच तारूबांदा गावात वाढीव वीज पोल तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

रायपूर येथील आश्रमशाळेला जाण्यासाठी शाळा सुरू होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन रस्ता मंजूर करण्यात यावा. १५ जूनपूर्वी सर्व आश्रमशाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच प्रत्येक गावात स्मशानभूमी आणि त्यासाठी पक्का जोडरस्ता तयार करण्यात यावा, असेही डॉ. उईके यांनी सूचविले.

यावेळी आमदार केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, नगराध्यक्ष सुनिल चौथमल, आदिवासी विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, आरोग्य उपसंचालक तसंगतुषार वारे, रमेश मावसकर उपस्थित होते. बैठकीपूर्वी डॉ. उईके यांचे धारणी येथील विश्रामगृह येथे आदिवासी परंपरेनुसार गदली सुसुन नृत्याने स्वागत करण्यात आले. तत्पुर्वी डॉ. उईके यांनी सकाळी तारूबांदा येथील कांद्रीबाबा हनुमान मंदिर भेट दिली.

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये उत्साह

प्रतिनिधी १९ मे



**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावती तर्फे बारावी सीबीएसई व स्टेट बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान समारंभ उत्साहात आज संपन्न झाला या समारंभास संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील तसेच संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी गुणवंतविद्यार्थ्यांना प्रमाणपत्र , शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे सांगितले. तसेच भविष्यातही विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून प्रगती करावी, असे मार्गदर्शन केले. डॉ. पी. एम. खोडके सर यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागील शिक्षक व पालकांच्या योगदानाचेही कौतुक केले. कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण वातावरण विद्यार्थ्यांच्या यशामुळे आनंदमय झाले होते.

# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत काशीबाई अग्रवाल विद्यालयाचे घवघवीत यश

◆ ६६ विद्यार्थ्यांपैकी ३६ विद्यार्थी ठरले पात्र ५५: ३८ टक्के लागला निकाल

प्रतिनिधी १९ मे



**दर्यापूर:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे तर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवीमध्ये शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी शाळेतील एकूण ६६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३६ विद्यार्थी पात्र ठरले असून शाळेचा एकूण निकाल ५५.३८ टक्के लागलाआहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन, सराव चाचण्या तसेच विशेष अभ्यास वर्गांचे आयोजन करण्यात आले होते.या यशाबद्दल येवदा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुसूदन ठाकूर, सचिव हर्षराज देशमुख, कोषाध्यक्ष प्रदीप भाऊ देशमुख व सर्व संचालक मंडळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांचे स्वागत केले.तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रदीप देशमुख सर, उपमुख्याध्यापक श्री अतहर सर, पर्यवेक्षक श्री किशोर थोटे सर तसेच परीक्षा प्रमुख श्री सुमित वानखडे सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेच्या या उज्ज्वल यशाबद्दल येवदा परिसरातून विद्यार्थ्यांवर व शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दिशा सालियन प्रकरणात CBI फेरचौकशीचे आ. रवी राणांचे आदेश

◆ बैठकित उत्पादन शुल्क अनियमिततेवर फौजदारी कारवाईचे निर्देश; अटल सेतु सुरक्षेसाठी २४ शस्त्रधारी २४ तास रक्षक तैनात व १५ दिवसांत उपाययोजना करण्याचे निर्देश

प्रतिनिधी १९ मे

**अमरावती :**महाराष्ट्र विधानसभेच्या आश्वासन समितीची महत्त्वपूर्ण बैठक आज समितीचे अध्यक्ष तथा आमदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत गृह विभागाशी संबंधित विविध आश्वासनांचे सविस्तर वाचन करण्यात आले असून, अनेक महत्त्वपूर्ण प्रकरणांवर समितीने कठोर भूमिका घेत संबंधित विभागांना स्पष्ट निर्देश दिले.

बैठकीदरम्यान दिशा सालियन मृत्यू प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (CBI) तात्काळ फेरचौकशी करण्याचे आदेश समिती अध्यक्षांनी दिले. या निर्देशामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष या बैठकीकडे वेधले गेले.

आजच्या बैठकीत सन २०१२ च्या तिसऱ्या अधिवेशनापासून ते सन २०२३ च्या तिसऱ्या अधिवेशनापर्यंतच्या गृह विभागाशी संबंधित एकूण ५४ आश्वासनांवर चर्चा करण्यात आली. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांच्यासह सचिव, सहसचिव, उपसचिव आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी समितीसमोर उपस्थित राहून विविध विषयांवर साक्ष व माहिती सादर केली.



बैठकीदरम्यान उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित काही अधिकाऱ्यांकडून बनावट पावत्या तयार करून वसुलीच्या हिशोबात अनियमितता झाल्याचा मुद्दा समोर आला. यावर समिती अध्यक्षांनी संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ विभागीय कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

तसेच अटल सेतू टोलनाक्यावरील सुरक्षेच्या अनुषंगाने ३-३-३ शिफ्ट पद्धतीने एकूण २४ शस्त्रधारी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. संपूर्ण अटल सेतू परिसरात हेल्पलाईन बॉक्स बसविण्याचे आदेश देत, संबंधित कामांची १५ दिवसांत अंमलबजावणी करून त्याचा अहवाल छायाचित्रांसह समितीसमोर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याच बैठकीत महामंडळाच्या वाहनांमुळे झालेल्या अपघातांमध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना तात्काळ भरपाई देणे, तसेच कुटुंबातील एका व्यक्तीस महामंडळात नोकरी देणे; अपंगत्व झाल्यास संपूर्ण वैद्यकीय खर्चासह १० लाख रुपये भरपाई देण्याबाबतही समितीने निर्देश दिले.

चेंबूर परिसरातील अनेक बस डेपो अंतर्गत महानगरपालिका शाळांमध्ये पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांना झालेल्या विषबाधेच्या प्रकरणावरही गंभीर दखल घेण्यात आली. संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकणे, तसेच त्याला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.

कोकणातील मुरुड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी बसविण्यात आलेले २६ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचा मुद्दा समोर आल्यानंतर ते तात्काळ कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले.

श्रद्धा वालकर हत्या प्रकरणासंदर्भात दिल्ली पोलीस आयुक्त आणि महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक (ञ्उझ्) यांना तात्काळ समन्वय साधून कार्यवाही करण्याचे आणि पीडित कुटुंबाला न्याय देण्याबाबत आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश समितीने दिले.

दरम्यान, कायद्याच्या अंमलबजावणीतील दुहेरी निकषांवरही बैठकीत चर्चा झाली. एखाद्या खाजगी व्यक्तीने मारहाण केल्यास तात्काळ गुन्हा दाखल होतो, मात्र काही प्रकरणांमध्ये शासकीय यंत्रणेशी संबंधित घटनांमध्ये सवलतीचा दृष्टिकोन घेतला जात असल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला.

या बैठकीस मुंबई व महाराष्ट्रातील एकूण ११ ञ्ण्झ् आणि ९ उपविभागीय पोलीस अधिकारी (ञ्ब्एझ्) उपस्थित होते .समितीच्या बैठकीस आमदार अमित झनक, विक्रम पाचपुते, राजेश पवार, समीर मेघे, अनुप अग्रवाल, विनोद अग्रवाल, सचिन कल्याण शेट्टी, पराग शहा, रमेश कराड, किशोर पाटील, अमोल पाटील, प्रदीप जयस्वाल, किरण सामंत, हिरामण खोसकर, संजय बनसोडे, दौलत दरोडा, वरुण सरदेसाई आणि राजू खरे आदी सदस्य उपस्थित होते. सदस्यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना आश्वासनांची पूर्तता वेळेत करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शासनाचे अमूस प्रधान सचिव सचिव व ईतर अधिकारी उपस्थित होते त्या मध्ये अनिल राणे अवर सचिव निलेश पालवे डीवायएसपी गंगापूर छत्रपती संभाजीनगर सुवर्णा पत्की पोलीस उपाधीक्षक कोल्हापूर धर्मपाल बनसोडे सह पोलीस आयुक्त नवी मुंबई प्रवीण खरा सीपीओ एमएमबी प्रकाश चव्हाण चेतन निकम उपसचिव गृह राजेश होळकर सहसचिव गृह विश्वनाथ इंरिसे सह पोलीस आयुक्त यमुना जाधव उपसचिव गृह सागर पाटील एडीजी ञ्उ ऑफीस श्रीनिवास घाडगे डीसीपी मुंबई रवींद्र जाधव एचडीपीओ चंद्रपुर रवींद्र बनसोडे डीसीपी क्राईम मुंबई नीता पाठवी एसीपी मालवणी कोझम बर्वे एपीआय मुंबई गजानन टोम्पे एचडीपीओ पुणे पंढरीनाथ पाटील एसीपी कुसुम वाघमारे डीवायएसपी माया मोरे एचडीपी अलिबाग शैलेश सनस एचडीपीओ खेड दीपक महाडिक पीआय बीपी जाधव एसी संजय निकुंभ पीआय परभणी दिलीप टिपरसे एचडीपी अहिल्यानगर सिटी सुग्रीव धपाटे सहसचिव गृह तुरुंग मुनी निर्मळ एस पी येरवडा जेल रवींद्र आवटे उपसचिव राज्य उत्पादन शुल्क मुक्तेश्वर जोशी एसटी महामंडळ नरेंद्र खांडेकर एसटी महामंडळ ज्ञानेश्वर रणवरे एसटी महामंडळ प्रवीण टिकले कक्ष अधिकारी गृह रवींद्र आवळे पोलीस उपायुक्त निरीक्षक सदाशिव शेलार पोलीस उपाधीक्षक उमरगा विनोद भोसे अवरसचिव गृह विभाग संजीव जगदाळे डीवायएसपी पुणे ज्ञानेश्वर गावशेते पीआय अँटीकरप्शन अतुल ढोणे कक्षा अधिकारी मनीषा जगताप मुंबई राजू घायेकर एपीओ मनीष जाधव एसीपी मुंबई एम एम मुंडे अवर सचिव सदानंद माने सिनियर पीआय सिक्युरिटी हाऊसिंग पहिले ध्ंसदाशिव साळुंखे कक्षा अधिकारी गृह अविनाश आगळे कक्षा अधिकारी गृह विनयकुमार ठाकूर डीवायएसपी चाळीसगाव जिल्हा जळगाव अनिल कोकाटे डीवायएसपी गोराई बीड प्रदीप पडोळे अवर सचिव गृह विभाग स्वप्निल कदम असिस्टंट पोलीस इन्स्पेक्टर सचिन सानप एपीआय क्राईम महेंद्र अलीबेकर भाईंदर पोलीस स्टेशन सुनील साळुंखे मिरा रोड पीआय विनायक जाधव एपीआय नवघर पोलीस स्टेशन आदी उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि १९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## भरदिवसा कारची काच फोडून २० लाखाची रोकड लंपास !



**कारंजा :** शहरात अज्ञात चोरट्याने भरदिवसा कारची काचे फोडून तब्बल २० लाख रुपये चोरी केल्याची घटना घडली.घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून चोरट्याचा शोध घेतला जात आहे.मात्र भरदिवसा मुख्य चौकात चोरीची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. वाशीम जिल्ह्यातील कारंजा शहरात भरदिवसा कारची काच फोडून तब्बल २० लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना समोर आली आहे. कारंजा बायपासवरील झाशी राणी चौक परिसरात आज सकाळी साडे अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. मानोरा येथील व्यापारी चेतन हेडा यांनी ॲक्सिस बँकेतून २० लाखांची रोकड काढल्यानंतर कारंजा बायपासवरील राधाकृष्ण हॉटेलसमोर कार उभी केली होती. दरम्यान, आंबे खरेदी करण्यासाठी ते रस्ता ओलांडून गेले असता चोरट्यांनी कारच्या खिडकीची काच फोडून रोकड असलेली बॅग लंपास केली. विशेष म्हणजे हा प्रकार अतिशय वर्दळीच्या ठिकाणी घडल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

### स्मशानभूमीने जागवला धार्मिक एकोपा...

# जीवनाचा अंत, माणुसकी जिवंत !

## परस्परांच्या श्रद्धांचा सन्मान करत तीन धर्मीय कुटुंबीयांनी दिला मानवतेचा संदेश

● अतिष देशमुख @ वाशीम ●

सध्या समाजामध्ये धर्म, जात, पंथ आणि विचारांच्या नावावर दुभंग वाढत असल्याच्या चर्चा सातत्याने होत असतात. सोशल मीडियाच्या गदारोळात तणावाच्या बातम्या झळकत असताना वाशीमच्या पद्मतीर्थ मोक्षधामात दि. १८ मे रोजी घडलेला प्रसंग मात्र समाजमनाला आश्वस्त करणारा ठरला. माणुसकी अजूनही जिवंत आहे, परधर्माचा आदर अजूनही समाजाच्या मनामनात रुजलेला आहे आणि भारतीय संस्कृतीतील 'सर्वधर्म समभाव' ही केवळ पुस्तकातील संकल्पना नसून प्रत्यक्ष कृतीतूनही जगली जाते, याचे प्रेरणादायी उदाहरण या घटनेतून पाहायला मिळाले.





सोमवारी सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास स्थानिक पद्मतीर्थ मोक्षधाम येथे अंत्यसंस्कारासाठी एकाच वेळी तीन पार्थिव दाखल झाले. कडाक्याचे ऊन, अंगाची लाही लाही करणारे तापमान आणि असह्य उकाडा अशा वातावरणातही स्मशानभूमीत जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच शांततेचा आणि समंजसपणाचा भाव दिसत होता.अल्लाडा प्लॉट परिसरातील स्व. शिलाबाई परमेश्वर अंभोरे (वय ५६), नगीना मस्जिद परिसरातील स्व. शांताबाई विष्णू भिसडे (वय ८५) आणि चामुंडा देवी मंदिर परिसरातील स्व. प्रकाश कुंडलिक पुरी (वय ६०) यांच्या पार्थिवांवर अंत्यसंस्कारासाठी त्यांचे आप्तस्वकीय आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्व. शिलाबाई अंभोरे आणि स्व. शांताबाई भिसडे यांचे सरण एकाच शेडमध्ये रचण्यात आले होते, तर स्व. प्रकाश पुरी यांच्यावर त्यांच्या धार्मिक परंपरेनुसार नदीपलीकडील भागात दफनविधीची तयारी सुरू होती. तिन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही त्या वातावरणात एक विलक्षण संवेदनशीलता आणि परस्पर सन्मानाचे दर्शन घडत होते.यावेळी स्व. शिलाबाई अंभोरे यांच्या अंत्यसंस्कारापूर्वी बौद्ध धर्माच्या परंपरेनुसार पंचशील आणि त्रिशरणाचे पठण सुरू होते. गंभीर वातावरणात सुरू असलेले हे पठण म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर शांतता, करुणा आणि समतेचा संदेश देणारे शब्द होते. ही विधी पूर्ण होण्यासाठी काही वेळ लागणार असल्याचे लक्षात आल्यानंतर शेजारीच अंत्यसंस्कारासाठी पूर्ण तयारी झालेल्या स्व. शांताबाई भिसडे यांच्या नातेवाईकांनी अत्यंत समंजस भूमिका घेतली. 'जोपर्यंत पंचशील आणि त्रिशरण पूर्ण होत नाही, तोपर्यंत आपण थांबूया,' असा निर्णय त्यांनी स्वयंस्फूर्तीने घेतला. विशेष म्हणजे, नदीपलीकडे दफनविधीची तयारी सुरू असलेल्या स्व. प्रकाश पुरी यांच्या आप्तस्वकीयांनीही याच मानवतावादी भावनेतून आपल्या धार्मिक विधींना काही काळ विराम दिला.त्या क्षणी तेथे धर्म नव्हते, पंथ नव्हते, श्रेष्ठ-कनिष्ठ भेद नव्हते, होती ती फक्त एकच भावना, समोरच्या व्यक्तीच्या श्रद्धेचा आदर.काही वेळाने पंचशील आणि त्रिशरणाचे पठण पूर्ण झाले आणि त्यानंतर दोन्ही सरणांना एकाच वेळी चिंताग्नी देण्यात आला. त्याचवेळी स्व. प्रकाश पुरी यांच्यावरही अंत्यसंस्कार करण्यात आले. दुःखाने भरलेल्या त्या वातावरणातही उपस्थितांच्या मनात समाधानाची एक शांत लहर उमटत होती. कारण त्यांनी या दिवशी केवळ अंत्यसंस्कार पाहिले नव्हते, तर मानवतेचा उत्सव अनुभवला होता. आजच्या ध्रुवीकरणाच्या काळात छोटी छोटी कारणे पुढे करून समाजात द्वेषाची बीजे पेरली जातात. धर्माच्या नावावर माणूस माणसापासून दूर नेण्याचे प्रयत्न होतात. अशा काळात वाशीमच्या पद्मतीर्थ मोक्षधामात घडलेला हा प्रसंग म्हणजे समाजाला दिशा देणारा दीपस्तंभ ठरावा असा आहे.भारतीय संस्कृतीची खरी ताकद ही विविधतेतील ऐक्यात आहे. माझा धर्म श्रेष्ठ, असे सांगण्यापेक्षा तुझ्या धर्माचाही मला तितकाच आदर आहे, ही भावना अधिक मोठी असते. पद्मतीर्थ मोक्षधामातील या घटनेने नेमका हाच संदेश समाजासमोर प्रभावीपणे ठेवला. स्मशानभूमी हे अंतिम सत्याचे स्थान मानले जाते. तेथे माणसाची ओळख संपत्ती, पद, जात किंवा धर्माने होत नाही; तर तो फक्त माणूस म्हणून उरतो. रविवारी या स्मशानभूमीत घडलेला प्रसंग याच जीवन तत्त्वज्ञानाला अधोरेखित करणारा ठरला. धर्म वेगळे असले तरी दुःख एकच असते, अश्रूंचा रंग एकच असतो आणि माणुसकीची भाषा देखील एकच असते, हे या दिवशी पद्मतीर्थ मोक्षधाम ने संपूर्ण समाजाला शिकवून दिले.

## थोडक्यात

### तृतीय पक्षाच्या तक्रारींवर कारवाईचा अधिकार नाही

शिक्षक नियुक्तीप्रकरणी उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेत तृतीय पक्षाने केलेल्या तक्रारींवर कारवाई करण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना नसल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायालयाने अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालकांनी दिलेला स्थगिती आदेश रद्द करत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व तक्रारदार प्रदीप प्रभाकर देशमुख यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.



हे प्रकरण वाशिम तालुक्यातील कोंडाळा महाली येथील ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय व मनोहर नाईक कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या नियुक्तींशी संबंधित आहे. या नियुक्त्यांविरोधात काही तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्या तक्रारींच्या आधारे अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालकांनी ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी नियुक्तींना स्थगिती देणारा आदेश जारी केला होता.या आदेशाविरोधात दत्तात्रय कवर, नरेश चव्हाण व शैलेश चव्हाण (रा. कोडाळा, जि. वाशीम) यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर व न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.सुनावणीदरम्यान न्यायालयाने शासनाच्या १४ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या परिपत्रकाचा संदर्भ देत स्पष्ट केले की, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीप्रकरणी केवळ प्रत्यक्ष अन्यायग्रस्त व्यक्तीलाच तक्रार करण्याचा अधिकार आहे. तृतीय पक्ष अथवा असंबंधित व्यक्तीला अशा प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याची परवानगी देता येत नाही. तसेच न्यायालयाने शिक्षण उपसंचालकांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. नियुक्तींमध्ये फसवणूक, चुकीची माहिती किंवा तथ्य दडपल्याचे कोणतेही ठोस आरोप नसताना केवळ तक्रारीच्या आधारे स्थगिती आदेश देण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले.तसेच हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याची माहिती असतानाही १२ डिसेंबर २०२३ रोजी घाईघाईने आदेश काढण्यात आल्याची नोंद न्यायालयाने घेतली. संबंधितांना योग्य संधी न देता व स्पष्ट कारणे नोंदविता आदेश जारी करण्यात आल्याने तो कायद्याच्या चौकटीबाहेर असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.याचिकाकर्त्यांतर्फे एड, पुरुषोत्तम पाटील आणि संस्थेतर्फे एड, राजु कडू यांनी बाजू मांडली.

### रिसोड बाजार समितीचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात...

# अवैध बांधकामाचा कारनामा, न्यायालयात होणार पंचनामा!

## अवैध बांधकाम भोवणार, कारवाईची टांगती तलवार, डॉ.देशमुख यांचा पत्रकार परिषदेत 'वार'

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्याच्या राजकारणाची राजधानी म्हणून ओळख असलेल्या रिसोडची प्रतिमा मलीन करणारा प्रकार समोर येत आहे. 'शेतकरी हितासाठी कटिबद्ध' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या रिसोड बाजार समितीचे अवैध कारनामे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. शिवसेना उबाठाचे नेते तथा माजी संचालक डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी काल दि. १८ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन बाजार समितीने केलेल्या अवैध कामांचा पाढाच माध्यमांसमोर मांडला आहे. परिणामी 'नाव मोठे, लक्षण खोटे' अशी अवस्था येथील बाजार समितीची झाली आहे.







शेतकरी,व्यापारी, आणि गाळेधारक यांचे कुठलेही नुकसान होऊ नये, तसेच बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांवर सुद्धा अन्याय होऊ नये म्हणून माझा हा लढा सुरू आहे. माझा प्रामाणिक हेतू असल्याने या संदर्भात आपण बाजार समितीच्या सचिवांपासून पणन व सहकार क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी आणि मंत्रालयातील मंत्रीमहोदयांपर्यंत हे प्रकरण पोहचवले होते. अखेर उच्च न्यायालयात देखील आव्हान दिले आहे..!

**डॉ. चंद्रशेखर देशमुख**,( मा. संचालक तथा याचिकाकर्ते )

शिवसेना ऊबाठा गटाचे नेते तथा बाजार समितीचे मा. संचालक डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी काल दि.१८ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन बाजार समितीच्या अवैध कारभारावर ताशेरे ओढले आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणाऱ्या बाजार समितीचा कारभार पारदर्शक रहावा आणि गाळेधारकांचे हित जोपासले जावे यासाठी डॉ. देशमुख यांनी सन २०१९ पासून लढा उभा केला आहे. त्या अनुषंगाने त्यांनी सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने तक्रारी करून बाजार समितीच्या ताब्यातील जमिनीवरील बांधकाम नियमित करून घेण्याची आग्रही मागणी केली होती. या संदर्भात बाजार समितीचे सचिव विजय देशमुख यांना वरिष्ठ प्रशासनाने अनेक वेळा सूचित देखील केले होते. मात्र मनमानी कारभार करणाऱ्या सचिवांनी या गंभीर बाबीकडे प्रत्येक वेळी दुर्लक्ष केले असल्याचा आरोप डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी केला आहे. आणि विशेष बाब म्हणजे उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यामुळे आजमितीस बाजार समितीचा संपूर्ण कारभारच अडचणीत आला असल्याची माहिती डॉ. देशमुख यांनी दिली आहे. बाजार समितीच्या अवैध कारभाराविरोधात लढा उभा करणारे डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बाजार समितीच्या अवैध कारनाम्याचे अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. यात प्रामुख्याने अवैध बांधकामाचा मुद्दा विशेष आहे. तसेच बांधकामाबाबत कुठलीही पूर्वसूचना न देता गाळे वाटप करण्यात आले असून यात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तद्वतच बांधकाम नियमितिकरणासाठी आवश्यक असलेल्या कुठल्याही परवानग्या बाजार समितीने घेतल्या नाहीत. आणि 'हम करें सो कायदा' या उर्मित कारभार करणाऱ्या बाजार समितीला तसे कधी वाटले सुद्धा नाही. त्यामुळेच आजमितीस सदर प्रकरण चिघळले असून बाजार समितीच्या अवैध कारभाराविरोधात आपण उभा केलेला लढा आता आणखीनच तीव्र करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

त्या अनुषंगाने आपण सर्वोच्च न्यायालयाचाही दरवाजा ठोठावला असून पुढील सुनावणी येत्या ११ जून २०२६ रोजी होणार असल्याची माहिती डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

### प्रतिकूल परिस्थितीवर मात करून

## धावपटू 'नैतिक'ची यशाकडे धाव !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तालुक्यातील एका तरुण धावपटूने क्रीडा क्षेत्रात आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे. तांदळी येथील नैतिक गोपाल घुमरे या अत्यंत गरीब कुटुंबातील मुलाने विविध धावण्याच्या स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशाची दखल घेत आ.शाम खोडे यांनी त्याला पुढील क्रीडा प्रवासा साठी दत्तक घेतले आहे.

नैतिक घुमरे याची घरची परिस्थिती अत्यंत



साधी आणि गरिबीची आहे. घरी केवळ एक एकर शेती असून त्याचे वडील तांदळी - महान या मार्गावर ऑटो चालवतात तर आई धुणे, भांड्याचे काम करते. यामुळे नैतिकच्या स्वप्नांना नवे पंख मिळाले असून, त्याला आता उत्तम दर्जाचे मार्गदर्शन आणि क्रीडा सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यावेळी नगरसेवक नंदलाल पवार, रमेशसिंह ठाकूर, बाळू दिवेकर आदींची उपस्थिती होती.

## शालेय पोषण, विद्यार्थ्यांचे शोषण, भ्रष्टशासन !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

### *काळ्या बाजारात राशन *

'विद्यार्थ्यांच्या ताटातील घास कोणी लाटला?' असा संतप्त सवाल उपस्थित करत वाशिम जिल्ह्यातील पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेत (शालेय पोषण आहार) कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विकास देविदास दाभाडे यांनी केला आहे. या संदर्भात अमरावती विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे. सन २०१८ ते २०२५ या कालावधीत शासकीय व अनुदानित शाळांना पुरविण्यात आलेल्या तांदळामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सन २०२० ते २०२४ या चार वर्षांच्या कालावधीत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने गठित चौकशी समितीने तब्बल १५ ते २० दिवस रेकॉर्ड तपासणी केल्याची माहिती समोर आली आहे.या चौकशीदरम्यान अनेक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बनावट सही, डुप्लिकेट शिक्के आणि बनावट पावत्यांचा वापर झाल्याची जोरदार चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात रंगली होती. संबंधित पुरावे आपल्याकडे उपलब्ध असल्याचा दावा निवेदन कर्त्यांनी केला आहे. या प्रकरणात बीड येथील जगदंबा इंटरप्रायझेस या ठेकेदाराकडून कोट्यवधी रुपयांची पुनर्प्राप्ती करण्यात आल्याचे सांगितले जात असले, तरी आजपर्यंत संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल न झाल्याने संशय अधिकच



गडद झाला आहे. 'घोटाळा सिद्ध झाला, मग कारवाई का नाही?' असा थेट सवाल उपस्थित करत संबंधित ठेकेदाराला पुन्हा काम देण्यात आल्यामागे कोणाचा आशीर्वाद आहे, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सरकार म्हणते शेतकऱ्यांचे कैवारी, डिझेलविना शेतकरी वाऱ्यावरी !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

**सध्या पावसाळी हंगाम जोरावर येण्याच्या मार्गावर असून शेतकरी आपल्या शेतीची मशागत, नांगरणी, वखरणी, पेरणीपूर्व तयारी या कामांमध्ये व्यस्त आहेत. मात्र अशा अत्यंत महत्त्वाच्या काळात डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. ट्रॅक्टरला डिझेल मिळाले नाही तर शेतीची कामे कशी करायची, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत.**



पावसाळी हंगामाच्या तोंडावर डिझेल टंचाई; ट्रॅक्टरची कामे ठप्प, शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली

शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा दावा करणारे सरकार प्रत्यक्षात शेतकऱ्यांना डिझेलविना वाऱ्यावर सोडत असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. पावसाळ्याच्या आधीची ही वेळ शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. जमिनीची मशागत वेळेवर झाली नाही, तर पुढील पेरणीवर त्याचा थेट परिणाम होतो. मात्र डिझेल टंचाईमुळे अनेक ठिकाणी ट्रॅक्टर उभे राहिले असून शेतीची कामे अर्धवट अवस्थेत थांबली आहेत.शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने ट्रॅक्टर, जेसीबी, रोटावेटर, नांगर, वखर यांची व्यवस्था केली आहे. मजूर मिळत नाहीत, शेतीची कामे यंत्रांवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत डिझेलच मिळाले नाही, तर शेतकऱ्यांनी शेती करायची कशी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. काही शेतकऱ्यांनी पेट्रोल पंपावर तासन्?तास रांगा लावल्या, तरी डिझेल मिळत नसल्याने त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

एकीकडे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या मोठमोठ्या घोषणा करते, योजना जाहीर करते; मात्र प्रत्यक्षात हंगामाच्या तोंडावर डिझेलसारखी मूलभूत गरज उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे. शेतीचा हंगाम वेळेवर सुरू झाला नाही, तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार असून त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल शेतकरी करत आहेत.डिझेल टंचाईमुळे ट्रॅक्टर चालक, शेतमजूर, शेतकरी आणि शेतीशी संबंधित सर्वच घटक अडचणीत आले आहेत. मशागत थांबल्याने पेरणी उशिरा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच वाढलेला खर्च, बियाणे, खते, मजुरी आणि यंत्रभाडे यामुळे शेतकरी त्रस्त आहे. त्यात डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

सरकारने आणि प्रशासनाने तात्काळ याची गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांसाठी डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा. पावसाळी हंगाम लक्षात घेता शेतीसाठी लागणारे डिझेल प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अन्यथा शेतकऱ्यांचा संताप रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही देण्यात येत आहे.

### डिझेलच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांचा पंपावरच जेवणाचा बेत

येथील बळीराजा पेट्रोल पंपावर डिझेलसाठी आलेल्या शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. सध्या पावसाळी हंगामातील शेतीची मशागतीची कामे जोरात सुरू असताना डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांना सकाळ, संध्याकाळ तसेच रात्रभर पंपावरच थांबून राहावे लागत आहे.

डिझेल मिळेल या आशेवर अनेक शेतकरी आपल्या ट्रॅक्टरसह नंबर लावून उन्हातच उभे आहेत. दिवसभर प्रतीक्षा करूनही डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. दरम्यान, घरून आणलेली भाकरीची शिदोरी संध्याकाळी थेट पंपावरच सोडून अनेक शेतकऱ्यांनी तिथेच जेवणाचा बेत केला. ट्रॅक्टरच्या बाजूलाच बसून शेतकरी डिझेलची वाट पाहत असल्याचे हृदयद्रावक चित्र पाहायला मिळाले.शेतीची कामे वेळेत पूर्ण व्हावीत म्हणून शेतकरी जीवाचे रान करत असताना डिझेलअभावी त्यांची मोठी परवड होत आहे. एकीकडे सरकार शेतकऱ्यांसाठी मोठमोठ्या घोषणा करत असताना प्रत्यक्षात मात्र बळीराजाला डिझेलसाठी रात्रंदिवस पंपावर थांबण्याची वेळ आल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि.१९ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# वीज मीटर आणखी स्मार्ट होणार; लाइट जाताच महावितरणला कळणार!

**खामगाव:** वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ग्राहकांना महावितरणच्या कार्यालयात किंवा कॉल सेंटरवर फोन करून तक्रार नोंदविण्याची कटकट आगामी काळात मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. स्मार्ट मीटर प्रणाली अधिक करण्यासाठी सक्षम महावितरणकडून विशेष सॉफ्टवेअर अपडेट करण्याचे काम सुरू करण्यात आले असून,

## तक्रार नोंदविण्याच्या कटकटीतून सुटका होणार!

वीजपुरवठा खंडित होताच संबंधित माहिती थेट नियंत्रण मिळणार आहे. महावितरणकडून जिल्ह्यात स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम वेगाने सुरू आहे. या स्मार्ट मीटर द्वारा वीज वापराची माहिती ऑनलाइन पद्धतीने संकलित केली जाते. आता नव्या प्रणालीमुळे एखाद्या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्यास त्या परिसरातील स्मार्ट मीटर त्वरित सिग्नल पाठवून महावितरणच्या नियंत्रण कक्षाला माहिती देणार आहेत. त्यामुळे बिघाड शोधण्यास आणि वीजपुरवठा पूर्ववत करण्यास कमी वेळ लागणार आहे.

# शिवसेना खामगाव विधानसभेचा प्रथमच बीएलए बुथप्रमुखांचा मेळावा

प्रतिनिधी १९ मे

**खामगाव:** शहरातील देवजी खिमजी मंगल कार्यालय येथे खामगांव विधानसभा मतदारसंघाचा शिवसेना, युवासेना, महिला आघाडी प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व BLA-2 बुथप्रमुख यांचे प्रशिक्षण व शिबीर संपन्न झाले.

विशेष म्हणजे दुपारची १:३० वेळ असताना सुद्धा भर उन्हात ४४.४५ डिग्री तापमान असताना अत्यंत उत्साहात बीएले बुथ प्रमुख मोठ्या प्रमाणात उपस्थिती सर्वांना प्रभावित करत होती. महिलांचा युवकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता खामगाव विधानसभा मध्ये प्रथमच बुथ प्रमुख BLA यांचा भव्य असा प्रशिक्षण मेळावा संपन्न झाला.शिवसेना पक्षाचे मुख्यनेते तथा राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी अनेक कल्याणकारी निर्णय घेतले.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव साहेब यांनी उपस्थित राहून संवाद साधला व मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण शिबीरास शिवसेना पश्चिम विदर्भ सचिव वैभव थोरात,बुलढाणा लोकसभा संपर्कप्रमुख संजयजी सोनार, शिवसेना पश्चिम विदर्भ समन्वक संजयजी अगलदरे यांची प्रमुख उपस्थिती होती.शिवसेना नेते अँड अमोल अंधारे यांची ँ-१ पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी उत्कृष्ट असे नियोजन करत ँ-२ बुथ प्रमुख मेळावा संपन्न केला. त्यांना शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

एँ अभियानाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर सुरू असलेल्या शिवसेना ँ नेमणूक अभियान संदर्भात खामगांव विधानसभा मतदारसंघातील



शिवसेना, युवासेना, महिला आघाडी प्रमुख पदाधिकारी,कार्यकर्ते बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत बूथ निहाय शिवसेना ँ नेमणुकीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच प्रत्येक बूथवर ँ नेमणुका लवकरात लवकर पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश सर्व शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांना देण्यात आले.यामुळे आज जनतेकडून आपल्याला पाठिंबा मिळत आहे.आपल्या सर्वांचे लोकप्रिय नेते एकनाथ शिंदे साहेब हे जनसामान्यांचे नेते आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना अधिक बळकट करून सर्वसामान्यांच्या विकासासाठी कार्य करणे हीच खरी शिवसैनिकाची ओळख आहे.

आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटन बळकटीकरण, बूथस्तरावरील नियोजन,तसेच स्थानिक पातळीवर प्रभावी रणनीती कशी राबवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत ँ नेमणूक प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाययोजना आणि पुढील कार्याची दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी शिवसेना संहसंपर्क प्रमुख शांताराम दाणे,शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषराव डिवरे, युवासेना जिल्हाप्रमुख श्री. ऋषीभाऊ जाधव,महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.शारदाताई पाटील, खामगांव शिवसेनेचे नेते अमोल अंधारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय अवताडे, शिवसेनेचे तालुका प्रमुख राजेंद्र बघे,शेगाव तालुकाप्रमुख रामा थारकर खामगाव, विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, युवासेना, महिला आघाडी प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सजंय गांधी , श्रावण बाळ निराधार योजनेच्या मागील वर्षाच्या पेंडींग केसेस मार्गी लावाव्यात

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी १९ मे

**खामगांव:** सजंय गांधी व श्रावण बाळ निराधार योजनेच्या मागील वर्षाच्या पेंडींग केसेस लवकरात लवकर मार्गी लावाव्यात व पटवाऱ्याकडून प्रत्यक्ष लाइव्ह फोटोची जाचक अट रद्द करावी या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदर निवेदनात नमूद केले आहे की, संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावण बाळ निराधार योजना व दिव्यांग बांधवांची पेंशन योजना तसेच विधवा निराधारांना मासिक मानधन मिळावे याकरीता २०२५ पासून ते आजपर्यंत आपल्या कार्यालयात हजारो अर्ज ऑनलाईन पध्दतीने केले गेले आहेत. तरी सदर अर्जावर तातडीने मिटींग घेऊन निकाली काढण्यात यावेत. अनेक अर्ज बाद करुन त्यामध्ये संबंधीत पटवाऱ्याचे लाभार्थ्यासोबत घराच्या लाईव्ह फोटोसह टाकण्यात आलेली अट रद्द करण्यात यावी. जेणेकरुन गरजू लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळण्यास मदत होईल.



तसेच संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने काढण्याची अट शासनाने लागू केली आहे. सदर प्रमाणपत्र काढल्यानंतर ते संबंधीत ऑफीस मध्ये जमा करणे बंधनकारक आहे काय याबाबत लाभार्थ्यांमध्ये अनेक गैरसमज निर्माण होत आहेत व विनाकारण संबंधीत कार्यालयामध्ये दिव्यांग बांधव, वयोवृद्ध महिला ह्या चकरा मारुन हेलपाटे घेत आहेत. त्यांना होणारी गैरसोय टाळण्याकरीता व योजनेचा प्रसार व प्रचार हा लाभार्थ्यांपर्यंत पोहचेल याकरीता पुरेपुर प्रयत्न करण्यात यावेत.

सदर मागणीची दखल न घेतल्यास राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी दिला आहे.

सदर निवेदनाच्या प्रतिलिपी ना.संजय सिरसाठ सामाजिक न्याय मंत्री ,ना.विजय वडेट्टीवार विरोधी पक्षनेता,हर्षवर्धन सपकाळ प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी,बच्चुभाऊ कडू, विधान परिषद सदस्य,ना. मकरंद जाधव पालकमंत्री,जिल्हाधिकारी बुलडाणा,डॉ. बबनराव तायवाडे राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी महासंघ नागपूर यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# ९ हजार ७४० रुपयांचा बेकायदेशीर दारूसाठा जप्त

## जळगाव जामोद पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १९ मे

**जळगाव जामोद:** पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जळगाव जामोद पोलीस स्टेशन अंतर्गत काल रात्री खेर्डा वेस भागात धडक कारवाई करण्यात आली. या धाडीत आरोपीकडून तब्बल ९ हजार ७४० रुपये किमतीचा बेकायदेशीर देशी आणि विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १५ मे २०२६ रोजी रात्री ९:०० वाजेच्या सुमारास जळगाव जामोद येथील खेर्डा वेस परिसरात एक व्यक्ती बेकायदेशीर दारूची विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे व त्यांच्या पथकाने पंचांसमक्ष सदर ठिकाणी धाड (प्रोव्ही रेड) टाकली.या कारवाईदरम्यान आरोपी आकाश अनिल इंगळे (वय ३२ वर्ष, रा. खेर्डा वेस, जळगाव जामोद) याच्या ताब्यातून विविध नामांकित कंपन्यांची देशी दारू, बिअर आणि महागडी व्हिस्की असा एकूण ९ हजार ७४० रुपये किमतीचा देशी दारू संत्रा (९० मि.ली.): १०० शिश्या (किंमत रु. ४,०००)देशी दारू संत्रा (१८० मि.ली.): ३५ शिश्या(किंमत रु. २,८००)रॉयल चॅलेंज प्रीमियर बिअर (५०० मि.ली.): ८ नग (किंमत रु. ८४०)मॅकडॉवेल्स नं. १ व्हिस्की (१८० मि.ली.): ५ नग(किंमत रु. १,०५०)रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की (१८० मि.ली.): ३ नग (किंमत रु. ७५०)मुंबई माल्ट व्हिस्की (९० मि.ली.): ४ नग (किंमत रु. ३००) जप्त करण्यात आला.या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये आरोपी आकाश इंगळे विरुद्ध अपराध क्रमांक ३१७/२०२६, कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये (मदाका) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार नितीनकुमार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास बीट पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय वेरुळकर व पोलीस कॉन्स्टेबल अयुब शेख करत आहेत.

# विवरा-रणगांव रस्ता व अपूर्ण राहिलेला नाला पूर्ण करा!

## शिवसेना उबाठाचे एसडीओ कार्यालयासमोर उपोषण

प्रतिनिधी १९ मे

**मलकापुर:** ग्राम विवरा येथील नाला खोलीकरण काम संबंधित ठेकेदाराने अपूर्ण सोडले असून ते काम पूर्ण करण्यात यावे व विवरा -रणगांव अपूर्ण राहिलेला रस्ता पूर्ण करण्याच्या मागणीसाठी विवरा येथील महिला व ग्रामस्थांसह शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास आदिंच्या प्रमुख उपस्थितीत उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांना निवेदन दिले होते, यापूर्वी नाल्यातच दि.१ मे २६ रोजी महाराष्ट्र दिनी आमरण उपोषण केले होते .

मागील वर्षी १६ सप्टेंबर २५ रोजी विवरा येथे ढगफुटी होऊन अतिवृष्टी झाली होती त्या अतिवृष्टी पावसाचे पाणी ग्रामस्थांच्या घरात घुसून शेकडो ग्रामस्थांचे नुकसान झाले होते, मंजुर झालेला नाला खोलीकरण काम पूर्ण करण्यात यावे, तसेच मौजे विवरा -रणगांव रस्ता मंजूर असून त्या रस्त्यामध्ये गावाजवळ दलित वस्ती असून संपूर्ण गावातील सांडपाणी



दलित वस्तीला लागून साचलेले असते त्या ठिकाणी दुतर्फा नाली बांधकाम करून रस्ता कॉंक्रिटीकरण करून पूर्ण करण्यात यावा अन्यथा दि. १८ मे २६ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता, शिवसेना(उबाठा)ने दिलेल्या निवेदनाची प्रशासनाने दखल न घेतल्याने आज १८ मे २६ सोमवार रोजी उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास यांच्या नेतृत्वात बळीराम राणे, शेषराव तायडे, सुखदेव वाढसे, देवराव तायडे, अभिजीत तायडे, विष्णू राणे,उमेश साहेबराव पाटील, झेंडू तायडे, विजय चौधरी, शालीग्राम कडू, गणेश पठाडे, भास्कर सरोदे, समाधान तायडे, राजेंद्र गुरचळ, पंडीत सोनवणे, वासुदेव भोगे, आनंद कडू, सागर तायडे, चेतन राणे, विलास तायडे, दीपक तळे, अतुल चोपडे, सूर्यभान कवडे, आनंद तायडे, दिलदार पिंजारी, शुभम आढाव, विष्णू राणे, अशोक गोरे ,अमित राजपूत, रामा रत्नपारखी, इमरान लकी सोपान शेलकर, नामदेव सोनवणे, संदीप कुदळे, विशाल पाटील,राहुल पाटील, अभिजीत कडू, प्रदीप हिरळकर, प्रमोद डमाळे, गणेश कडू, रामदास संबारे, दयाराम बोदडे,समाधान सोनोने,भगवान धांडे, ओंकार पाटील, भूषण पाटील, गजानन ढोण, गजानन नाफडे, घनश्याम चोपडे, गणेश वाडसे, वासुदेव वाडसे, मधुकर पाटील, अर्जुन चोपडे, प्रशांत कडू,सोनु सोनोने, अमीत राजपूत, प्रशांत तायडे, नंदकिशोर झाल्टे, ईश्वर पाटील, राहुल पाटील, मोहन चोपडे, रोशन बोदडे, ज्ञानेश्वर भगत, यश झाल्टे सह ग्रामस्थांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. या उपोषणाला शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे,माजी न.प उपाध्यक्ष महादेव वनारे, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, किसान सेना तालुकाप्रमुख महादेव पवार, उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर,विभाग प्रमुख सत्तार शाह,माजी ,जि.प उपाध्यक्ष सोपान शेलकर,हरिदास शिंदेसह आदिंनी भेट देवून पाठिंबा दिला आहे.

# सीबी कप २०२६ जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा उत्साहात

## हम्मद रायडर्स टुनकी संघाने पटकाविले १ लाखांचे प्रथम बक्षिस

प्रतिनिधी १९ मे

**खामगाव:** श्री छत्रपती प्रतिष्ठान खामगाव व सी.बी.कप मॅनेजमेंट टिम पॉवर्ड बाय एन जे स्पोटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नांदुरा येथील तालुका क्रीडा संकुल येथे आयोजित जिल्हास्तरीय भव्य सीबी कप २०२६ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत हम्मद रायडर्स टुनकी संघाने १ लाखांचे प्रथम बक्षिस तर राजे छत्रपती शेगाव संघाने ५० हजारांचे व्दितीय पारितोषिक पटकाविले आहे.

नांदुरा तालुका क्रीडा संकुल येथे दि. ११ ते १४ मे दरम्यान या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामाध्यमातून जिल्ह्यातील आणि परिसरातील प्रतिभावान



खेळाडूंना मोठ्या व्यासपीठावर आपली छाप पाडण्याची ही सुवर्णसंधी मिळाली. दरम्यान एनजे स्पोर्टस प्रोडक्शन टीमकडून कॅमेऱ्यांनी स्पर्धेचे युट्युबवर लाईव्ह कव्हरेज देखील करण्यात आले. प्रथमताच जिल्ह्यात भव्य प्रकाश व्यवस्थेत रात्रीचे सामने येथे खेळविण्यात आले, त्यामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये मोठा उत्साह पहावयास मिळाला. या स्पर्धेत हम्मद रायडर्स टुनकी संघाने १ लाखांचे प्रथम बक्षिस तर राजे छत्रपती शेगाव संघाने ५० हजारांचे व्दितीय पारितोषिक पटकाविले आहे. तर बेस्ट बॅट्समन म्हणून विक्रांत गुळवे, बेस्ट बॉलर करण बेंडवाल, प्लेअर ऑफ द सिरीज जावेद चौधरी यांना गौरविण्यात आले. स्पर्धेच्या समारोप प्रसंगी श्री छत्रपती प्रतिष्ठान खामगावचे अध्यक्ष स्वप्नील ठाकरे पाटील व सी.बी.कप मॅनेजमेंट टिम पॉवर्ड बाय एन जे स्पोटर्स यांच्याकडून विजेत्या संघास पारितोषिक व खेळाडूंचा बक्षिस देवून गौरव करण्यात आला.

स्पर्धेच्या आयोजनासाठी सचिन चरणसिंग बोराडे, सचिन सराफ, नितीन भगत खामगाव, सचिन वारूळकर शेगाव, प्रेम सावळे शेगाव, प्रमोद जाधव नांदुरा, प्रकाश बरदे नांदुरा, उमेश वानखडे संग्रामपूर, नंदकिशोर जाने आमसरी आदींचे सहकार्य लाभले. स्पर्धेदरम्यान अभी दिप लाईट यांच्याकडून मैदानावर प्रकाशव्यवस्था करण्यात आली होती.

# दारूसाठी झालेल्या वादातून मुलानेच केली वडिलांची हत्या

## शेतातील घराजवळ सरपणाच्या सहाय्याने वडिलांचा आरोपीने मृतदेह जाळला होता

प्रतिनिधी १९ मे

**बुलढाणा:** तालुक्यातील हतेडी खुर्द येथे दारूसाठी झालेल्या वादातून मुलानेच वडिलांची हत्या करून मृतदेह जाळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सुरुवातीला बेपत्ता असल्याची माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्यात आली होती; मात्र तांत्रिक तपास, कॉल डिटेल्स आणि गुप्त माहितीच्या आधारे ग्रामीण पोलिसांनी प्रकरणाचा छडा लावला.

ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समाधान घायवट हे ८ मे रोजी अचानक बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांना संशयास्पद बाबी आढळून आल्या. तपासात निष्पन्न झाल्यानुसार, मध्यरात्रीच्या सुमारास दारू आणण्याच्या कारणावरून वडील आणि मुलामध्ये वाद झाला. त्यानंतर आरोपी मुलाने वडिलांच्या गुप्तांगावर जोरदार लाथ मारल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

प्रकरण उघड होऊ नये, म्हणून मृतदेह शेतातील जळतणामध्ये टाकून जाळण्यात आल्याचा गंभीर आरोपही पोलिसांनी नोंदविला आहे. यानंतर आरोपीने वडील घर सोडून गेल्याची खोटी माहिती देत पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात समोर आले. ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध खून करणे, पुरावे नष्ट करणे, खोटी माहिती देऊन दिशाभूल करणे आणि गुन्हा लपविण्याच्या आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक शरद माळी करीत असून, पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील आणि पोलिस निरीक्षक गजानन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सुरुवातीला हे प्रकरण बेपत्ता व्यक्तीच्या चौकशीपुरते मर्यादित होते; मात्र कॉल डिटेल रेकॉर्ड, लोकेशन तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनाक्रमाची सांगड घालत संशयित हालचाली उघड केल्या. त्यानंतर प्रकरणाने थेट खुनाचे गंभीर वळण घेतले.दरम्यान, या प्रकरणात पोलिसांना वडील बेपत्ता झाल्याची तक्रार देणाऱ्या अनिकेत समाधान घायवट याच्यावर संशय आला. तो काहीसा गुमसूम रहात होता. फारसा कोणाशी बोलत नव्हता. त्यामुळे पोलिसांनी त्याची सर्वकष माहिती काढली. तेव्हा पोलिसांनाही आश्चर्याचा धक्का बसला. पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर तो बोलता झाला व खुनाचे रहस्य उलगडले. दरम्यान, दारूच्या व्यसनातून निर्माण होणारे कौटुंबिक वाद किती टोकाला जाऊ शकतात, याचे हे गंभीर उदाहरण असल्याची चर्चा परिसरात होत आहे.

# जळगाव परिसरात वन विभागाची कारवाई

## लाकडाच्या अवैध साठ्यावर छापे; साडेचार लाखांचा माल जप्त

प्रतिनिधी १९ मे

**जळगाव जामोद:** संग्रामपूर मार्गावरील चांगेफळ परिसरात वनविभागाने दोन वेगवेगळ्या दिवशी धाड टाकून अवैध लाकूड साठ्यावर मोठी कारवाई केली. या कारवाईत विनापरवाना साठवून ठेवलेले तब्बल ३६८ नग नीम (कडुनिंब) प्रजातीचे लाकूड जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजे किंमत ४ लाख ७९ हजार ५०० रुपये असल्याची माहिती वनविभागाने दिली. मिळालेल्या माहितीनुसार, वनविभागाच्या पथकाने १४ मे रोजी दुपारी २:३० वाजता तसेच १७ मे रोजी दुपारी १२.३२ वाजता चांगेफळ परिसरातील संशयित ठिकाणांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान विनापरवाना व अवैधरीत्या साठवून ठेवलेला कडुनिंब लाकडांचा मोठा साठा आढळून आला. वनविभागाने तातडीने पंचनामा करून वनगुन्हा नोंदवला. तपासादरम्यान खाटूश्याम सॉ मिलच्या बाहेरील एका खासगी जागेत हा अवैध साठा लपवून ठेवण्यात आल्याचे उघडकीस आले. या कारवाईत अंदाजे ५० घनमीटर लाकूड जप्त करण्यात आले आहे. यासोबतच न्यू सातपुडा सॉ मिल आणि जामोद परिसरातील इतर ठिकाणांचीही तपासणी करण्यात आली. ही कारवाई उपवनसंरक्षक जमीर शेख व सहायक वनसंरक्षक वैभव काकडे यांच्या मार्गदर्शनात केली. यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी नीलेश काळे, वनपाल एस. एस. सावळे, मोबाइल स्क्वॉड वनपरिक्षेत्र अधिकारी उमेश राऊत, वनरक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने हरीश रावळ यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा सन्मान

प्रतिनिधी १९ मे

**मलकापुर:** शहरातील संत ज्ञानेश्वर नगर, सातव प्लॉट, प्रभाग क्रमांक १५ मध्ये गेल्या आठ महिन्यापासून पंधरा ते वीस घरांना पाणी येत नसल्याने पाणीपुरवठा अभियंता बयस यांच्या कार्यालयातच माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. हरीश रावळ, अनिल बगाडे सह महिलांनी ठिय्या आंदोलन केले होते. या भागात न.प.ने नव्याने पाईपलाईन करून उपरोक्त घरांना काल



पाणीपुरवठा सुरळीत केल्याने, आज दि.१८ मे २६ रोजी या भागातील महिलांनी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. हरीश रावळ, माजी नगरसेवक अनिल बगाडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला? यावेळी कमलबाई भोपळे,विशाल भोपळे, मेघा भोपळे ,चंदुभाऊ वायडे,छोटुभाऊ ईसाळकर,गणेश खराटे,उषाबाई खराटे ,भोनाजी वायडे, नारायण दिवकार ,पांडुरंग जगताप,जिजाबाई जगताप, संगिता भोपळे, शामकांत जोशी, गजानन वायडे ,सरलाबाई वायडे,मंजुळाबाई दिवकार सह आदिंची उपस्थिती होती.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि.१९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# सर्जा राजापेक्षा आता ट्रॅक्टर कडे शेतकऱ्यांचा कल

## बैल जोडी सांभाळण्यापेक्षा ट्रॅक्टरचा खर्च कमी






प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** आधी बैल जोडी ज्याच्या दारी तो शेतकरी अशी समजुत होती परंतु ही समजूत आता मोड़ीत निघाल्याचे दिसून येत आहे. आता ज्याचे दारी ट्रॅक्टर तो शेतकरी ही व्याख्या पुढे येत आहे. आता सर्वत्र खरीप हंगामाची लगबग दिसून येत आहे त्यामुळे शेती कामाची लगबग सुरू झाली आहे गेल्या काही वर्षांमध्ये बैल जोडीला लागणारा खर्च मजुरांची टंचाई या कारणामुळे शेतकरी यांत्रिकीकरणाकडे वळले आहेत अनेक शेतकरी आता बैलजोड्यांची खरेदी करण्यापेक्षा ट्रॅक्टर खरेदीवर अधिक भर देत आहेत गेल्या काही वर्षात ट्रॅक्टर खरेदीत मोठी वाढ झाल्याचे दिसते. शेतकरी यांत्रिकीकरणाकडे वळावे यासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जातात त्यात शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते यासह जीएसटीतील कपात आणि वाढते आधुनिकीकरण यामुळे २०२५ २६ या आर्थिक वर्षात ट्रॅक्टरच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे शासकीय योजनांचा विचार केला तर या वर्षात ५०० हून अधिक शेतकऱ्यांनी शासकीय योजनेतून ट्रॅक्टर घेतले आहेत.

### मजुरांची टंचाई हे सुद्धा एक मोठे कारण

शेती कामांसाठी वेळेवर मजूर मिळणे अत्यंत कठीण झाले आहे तसेच मजूरचे दरही गगनाला भिडले आहेत दुसरीकडे वर्षभर बैलजोडी सांभाळणे त्यांचा चारा आणि संगोपनाचा खर्च आता लहान व मध्यम शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या परवडेनासा झाला आहे. त्यामुळे पारंपारिक शेतीपेक्षा ट्रॅक्टरने शेतीची कामे करणे ही वेळेची आणि पैशाची बचत करणारे ठरत आहे कमी वेळेत अचूक काम करण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी आता मोठ्या प्रमाणावर यांत्रिकी शेतीकडे वळवला आहे नांगरणी रोटावेटर चालवणे पेरणी ते थेट कापणी आणि वाहतुकीपर्यंतच्या सर्व कामांसाठी ट्रॅक्टरचा वापर वाढला आहे खरीप हंगामाची पूर्व मशागत वेळेत आटवण्यासाठी शेतकरी ट्रॅक्टरलाच पहिली पसंती देत आहेत

# यंदा नालेसफाई योग्यरित्या करण्याची मनपाकडून अपेक्षा

## वरवरची नाहीतर खोलवर गाळ काढण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** महापालिकेच्या वतीने पावसाळ्यापूर्वी नालेसफाईच्या कामाचे नियोजन करण्यात आले असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरवात होणार आहे. मात्र, गेल्या वर्षी नालेसफाईवर करोडो रुपयांचा खर्च करूनही पावसाळ्यातच नव्हे, तर अवकाळी पावसातही नाल्या तुंबून शहरातील बाजारपेठ, रस्ते व दुकानांमध्ये पाणी शिरल्याचा वाईट अनुभव नागरिकांनी घेतला आहे. त्यामुळे यंदाच्या नालेसफाईवर प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

अकोला शहरात पाणी वाहून जाणारे लहान-मोठे मिळून सुमारे १४४ नाले व छोट्या नाल्या आहेत. दरवर्षी स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासनाच्यावतीने वार्षिक आराखडा तयार करून करोडो रुपयांची तरतूद केली जाते. प्रत्यक्षात मात्र कंत्राटदारांकडून कामात हलगर्जीपणा केला जात असल्याचे समोर आले आहे. मॉन्सूनचे आगमन अवघ्या काही दिवसांवर आले असतानाही अद्याप प्रत्यक्ष सफाई सुरू झालेली नाही. केवळ नाल्यांतील कचरा वरवर काढणे म्हणजे नालेसफाई नव्हे, तर नाल्यातील वर्षानुवर्षांचा गाळ आणि प्लॅस्टिक काढणे आवश्यक आहे. मात्र, केवळ वरवरची स्वच्छता करून देयके (बिले) उचलली जात असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. प्रशासनाने यावर कडक देखरेख ठेवली नाही, तर यंदाही पावसाळ्यात शहराची दैना होण्याची भीती आहे. 'शहरातून वाहणारे मोठे नाले दुरुस्ती अभावी अरुंद झाले आहेत. त्यात मोठा कचरा साचला आहे. या नाल्यांमध्ये गाळापेक्षा प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा खच साचला आहे या नाल्यांमध्ये गाळापेक्षा प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा खच मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. महापालिकेने युद्धपातळीवर नालेसफाईची कामे करावी. अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल.' असा इशारा विरोधी पक्षनेते देत आहेत.

### यंदा नालेसफाईवर एक कोटीचा जास्त खर्च

◆ 'पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व लहान-मोठ्यानाल्यांची सफाई करण्याचे नियोजन आहे. यासाठी नुकतीच निविदा (टेंडर) प्रक्रिया राबविण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा नालेसफाईसाठी अंदाजे एक कोटी नऊ लाख रुपये अधिक खर्च अपेक्षित असल्याची माहिती आहे वाढती गाळ सफाई यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचा खर्च यामुळे खर्चात वाढ झाली आहे. सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून लवकरच प्रत्यक्ष नालेसफाईच्या कामाला सुरवात केली जाईल.' अशी माहिती संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी दिली

### पावसाळ्यात पुन्हा शहर तुंबणार काय नालेसफाईला केव्हा होईल सुरुवात?

यंदाही पावसाळा तोंडावर आला असून महानगरपालिकेकडून नालेस सफाईच्या कामाची लगबग सुरू झाली आहे मात्र प्रत्यक्ष कामांना अद्याप वेग आलेला नसल्याने शहर पुन्हा पाण्यात जाणार का अशी भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे झाल्यावर अतिक्रमणे प्लास्टिक कचऱ्याचा वाढता साठा गाळ पूर्णपणे न काढणे वेळेत कामे न होणे पावसाच्या पाण्याच्या नैसर्गिक मार्गावर अडथळे आदीमुळे पाण्याचा प्रवाह रोखला जाऊन नाले तुंबण्याच्या घटना वाढत आहेत

# मदनलाल धिंग्रा यांच्या फोटोची विटंबना

## ◆ अकोट येथील आरोपीला घेतले ताब्यात

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** शहरातील नवीन बसस्थानक परिसरात असलेल्या हुतात्मा क्रांतिकारी मदनलाल धिंग्रा यांच्या फोटोची विटंबना केल्याची घटना समोर आल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सिटी कोतवाली पोलिसांनी अवघ्या बारा तासांत आरोपीचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले आहे.

अकोला शहरातील धिंग्रा चौक, नवीन बसस्थानक समोरील परिसरात असलेल्या हुतात्मा क्रांतिकारी मदनलाल धिंग्रा यांच्या फोटोची अज्ञात व्यक्तीकडून विटंबना करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. फोटो अर्धवट वाकवलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. याबाबतची माहिती सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे हवालदार निलेश पुरुषोत्तम भगत यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सार्वजनिक शांतता भंग होऊ नये यासाठी पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत फोटो पूर्वस्थितीत केला. त्यानंतर अज्ञात आरोपीविरोधात सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असताना सिटी कोतवाली पोलिसांच्या डीबी पथकाने अकोट येथील इमामबाडा परिसरातील जाफर अली उर्फ लुई आसीफ अली, वय २७ वर्षे, याला ताब्यात घेतले असून अवघ्या बारा तासांत हा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

# पत्नी हत्या प्रकरणातील आरोपीला पोलिस कोठडी

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** शहरातील डाबकी रोड परिसरातील रेणुका नगर येथे पत्नीच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या पतीला न्यायालयाने १९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांकडून आरोपीची कसून चौकशी सुरू आहे. पत्नीची हत्या केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या पतीला पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता न्यायाधीशांनी आरोपीला १९ मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्येही मोठी चर्चा सुरू आहे. घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलीस करीत असून आरोपीकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले.


# वॉल्व मधून सतत पाणी वाहते

## महापालिका जलप्रदाय विभागाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** शिवसेना वसाहत परिसरात वॉल्व मधून सतत पाणी वाहते. त्यामुळे दररोज हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होतो. पाणी जपून वापरणे आवश्यक असताना अशा प्रकारे नासाडी योग्य नाही अशी भावना व्यक्त केली जात आहे. विविध कारणांमुळे दररोज पाणी वाहताना दिसते.

कधी गांधी चौकात तर कधी जठारपेठ भागात जलवाहिनी फुटून पाणी वाहते. मात्र, जलप्रदाय विभागाने तातडीने दुरूस्ती साठी हालचाल केली जात नाही. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो.



काटेपूर्णा प्रकल्पातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक बदलले आहे. आता पाच दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. परंतु काही भागात तर आठव्या दिवशी पाणी पुरवठा होणार आहे. पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक सध्या विस्कळीत झालेले दिसते. शहरातील पाणी समस्या गंभीर होत आहे. पाणी जपून वापरण्याशिवाय पर्याय नाही. याबाबत सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आणखी दोन महिने तरी उपलब्ध पाण्यावर भागवावे लागणार आहे.

# जन्म मृत्यू प्रमाणपत्रासाठी द्यावी लागते अग्नी परीक्षा

## ४६ अंश तापमानात उघड्यावर बसण्याची वेळ

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** जन्म मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांना उन्हातान्हात बसून राहावे लागत आहे. हा सगळा प्रकार त्यांच्यासाठी अग्नी परीक्षा ठरतो आहे. प्रमाणपत्र लवकर प्राप्त होण्याऐवजी वाट पाहत बसावे लागते. कर्मचाऱ्यांना लंच टाईम मध्ये एक तास तिष्ठत बसावे लागते आहे.

जन्म मृत्यू नोंदीच्या नागरी सुविधा केंद्रात प्रमाणपत्रासाठी नागरिकांची गर्दी होते. एक तासाच्या लंच टाइम मध्ये पूर्ण काम बंद राहते आणि लोकांना एवढ्या उना मध्ये त्यांची वाट पाहावी लागते. विशेष म्हणजे लाईन मध्ये



उभे राहिल्यावर तांत्रिक बिघाड आहे असे सांगण्यात येते. या संदर्भात ओरड झाल्यामुळे वरिष्ठांनी दखल घेऊन जन्म मृत्यू प्रमाणपत्रातील त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु अद्याप काही फरक पडला नाही. लोकांची परीक्षा पाहणे बंद करा अशी मागणी आहे.

# कचरा घंटागाडी, क्युआर कोड मिस मॅच नाही : विजय अग्रवाल

## ◆ कंत्राटदाराला पेमेंटच केले नाही

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** घंटागाडीचा क्यूआर कोड मिस मॅच नाही तर ज्या वाहनावर तो हवा होता त्यात गल्लत झाली. या त्रुटींमुळे कंत्राटदाराला पेमेंटच केले नाही असे स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी स्पष्ट केले.



घंटागाडीचे जीपीएस लोकेशन आणि स्कॅनिंग लोकेशन मॅच होत नसताना केंद्र सरकारने काही कोटींचा निधी महापालिकेला दिला नाही. असे असताना १५ व्या वित्त आयोगात प्राप्त झालेला साडे सत्तावीस कोटींचा निधी कोणाला दिला अशी विचारणा होत होती. या बाबतीत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी महापालिकेची भूमिका मांडली.

अग्रवाल म्हणाले, आता तर कलेक्शनची पद्धत बदलली आहे. टॅक्सशी जोडले आहे. तसेच कचरा गोळा करण्यापासून सर्व कामे कंत्राटदाराला करावी लागणार आहेत. महिना सव्वा महिन्यात कामे सुरळीत होतील असे विजय अग्रवाल यांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना सांगितले.

# जीएमसी शवचिकित्सा नवीन इमारती मध्ये सुविधांचा अभाव

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** 'अकोल्याच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पोस्टमार्टम विभागासाठी नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. कोणतीही दुर्घटना किंवा अनुचित घटना घडल्यास मृतदेह शवविच्छेदनासाठी येथे आणला जातो. आपल्या जवळच्या व्यक्तीचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी मृतदेहाला ताब्यात घेण्यासाठी कुटुंबातील लोक मोठ्या संख्येने जीएमसीमध्ये येतात.परंतु सुविधा मात्र अपु-या आहेत.

नवीन पोस्टमार्टम विभागाची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली



आहे. येथे लोकांना बसण्यासाठी साधी सोयही नाही. सध्या ४६ अंश सेल्सिअस तापमान असताना, लोकांना बाहेर उन्हात ताटकळत बसावं लागत आहे. येथील स्वच्छतागृहे पूर्णपणे घाणीच्या साम्राज्यात अडकली आहेत आणि पिण्याच्या पाण्याची तर कोणतीही सोय नाही. मुळात पोस्टमार्टम विभागाच्या नावानेच लोक आधीच घाबरतात आणि त्यातच कुटुंबातील व्यक्ती गेल्यामुळे नातेवाईक आधीच प्रचंड मानसिक त्रासात आणि दुःखात असतात. अशा संवेदनशील ठिकाणी अकोला जीएमसी प्रशासन नागरिकांना साध्या मूलभूत सुविधाही पुरवू शकत नाही, ही अत्यंत संतापजनक आणि लाजिरवाणी बाब आहे, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

# अकोला जिल्ह्यात उष्णतेची लाट

## ◆ हवामान विभागाचा नागरिकांना इशारा

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे १८ मे ते २३ मे दरम्यान अकोलासह विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत, उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे, लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नयेत, तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी प्यावे, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत. चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा, पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरगणना मोहिमेला प्रारंभ, १६ मे ते १४ जून या कालावधीत मोहीम पार पडणार

प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** महानगरपालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. १६ मे ते १४ जून या कालावधीत ही मोहीम पार पडणार असून, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष घरगणनेचे कार्य सुरू करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत प्रगणकांकडून एचएलबी सीमांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी, घरांना क्रमांक देणे तसेच कार्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या नकाशाच्या प्रारूपात घरे, धार्मिकस्थळे, शाळा, महाविद्यालये आदींचे कच्चे नकाशे तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यानंतर २० मे पासून प्रगणक घराघरांत जाऊन नागरिकांकडून माहिती संकलित करून ती ऑनलाइन प्रणालीवर अपलोड करण्यात येणार आहे. या जनगणना प्रक्रियेसाठी मनपाच्या पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण क्षेत्रीय कार्यालयांनुसार चार्ज अधिकारी तथा सहायक आयुक्तांच्या आधिपत्याखाली एकूण १५५ पर्यवेक्षक आणि ९३१ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# ई केवायसीसाठी महिलांची महिला बाल कल्याण विभागात गर्दी



प्रतिनिधी १९ मे

**अकोला :** ई केवाईसी मध्ये दुरूस्ती करण्यासाठी महिलांची महिला बाल कल्याण विभागात गर्दी दिसून आली. महिलांच्या खात्यात लाडक्या बहीण योजनेचे पैसे जमा न झाल्यामुळे त्यांची तगमग होत आहे. केवाईसी व्यवस्थित झाली किंवा त्यातील त्रुटी दूर झाल्या तर महिलांना लाभ होऊ शकतो. कारण सध्या महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा केले जात आहे. पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आपल्या खात्यात देखील रक्कम जमा व्हावी तसेच योजनेचा लाभ मिळावा म्हणून उन्हातान्हात हातची कामे बाजूला ठेवून महिलांनी महिला बाल कल्याण विभागात गर्दी केलेली दिसली.

# आदित्य भोजगढीया ( अग्रवाल ) यांची एनटीएमध्ये संयुक्त संचालकपदी नियुक्ती

प्रतिनिधी १९ मे

**मुर्तिजापूर :** केंद्र सरकारच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय परीक्षा संस्था एनटीए मध्ये संयुक्त संचालक पदावर दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीस मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मंजुरी दिली आहे. यामध्ये मुर्तिजापूर येथील रहिवासी असलेले अधिकारी आदित्य राजेंद्र भोजगढीया (अग्रवाल )यांची संयुक्त संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मुर्तिजापूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



चिरंजीव आदित्य हे वृत्तपत्र व्यवसायीस्वर्गीय नंदलाल सागरमल अग्रवाल यांचे नातू असून राजेंद्र अग्रवाल यांचे चिरंजीव आहेत चिरंजीव आदित्य या अगोदर भारत सरकार वित्त विभागात कार्यरत होते. भारत सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने १६ मे २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन ज्ञापनानुसार, आदित्य राजेंद्र भोजगढीया यांची राष्ट्रीय परीक्षा संस्था मध्ये ' नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा कार्यकाळ १६ मे २०२८ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत राहणार आहे. तसेच अधिकारी आकाश जैन यांचीही एनटीए मध्ये संयुक्त संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK